cmyk

## संपादकीय

### एकत्रीकरणाच्या टाळी बाबत अजूनही संभ्रमच

तब्बल २० वर्षानंतर ठाकरे बंधू एकत्र आल्याने राज्यातील राजकारण चांगलेच ढवळून निघाले. ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याने राज्यातील राजकीय समीकरणे कशी बदलतील याच्या चर्चा सुरू झाल्या. शिवसेना ठाकरे गटाकडून उध्दव ठाकरे यांनी मेळाव्यात बोलताना एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठी असे पुढील युतीबाबत स्पष्ट संकेत दिले. शिवसेनेकडून संजय राऊत यांनी देखील युतीबाबत शिवसेनेची भूमिका स्पष्ट केली, मात्र मनसेकडून ना राज ठाकरे ना कोणत्या नेत्याने युतीबाबत स्पष्ट भूमिका अद्याप मांडलेली नाही.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### अंधश्रद्धेतून बिहारमध्ये एकाच कुटुंबातील पाच जणांना जिवंत जाळले

पाटणा : बिहारमधील पूर्णिया येथे अंधश्रद्धेच्या आहारी गेलेल्या लोकांनी क्रूरतेचा कळस गाठत एकाच कुटुंबातील पाच जणांना जिवंत जाळून त्यांची निर्दयीपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना मुफस्सिल पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रानीपतारा तेटगामा या गावात घडली. धक्कादायक बाब म्हणजे हत्येनंतर पाचही जणांचे मृतदेह हल्लेखोरांनी गायब केले. हत्या झालेल्या कुटुंबातील महिलेवर चेटकीन असल्याचा संशय या हल्लेखोरांनी व्यक्त केला होता. या संशयाच्या आधारे या महिलेसह कुटुंबातील पाच जणांना घेरून काही लोकांच्या जमावाने मारहाण केली. त्यांनंतर त्यांना जिवंत जाळून पाच निष्पाप लोकांचे जीव घेतले. त्यानंतर त्यांचे अर्धवट जळालेले मृतदेह पोत्यात भरून ते एका तलावात फेकून दिले. या धक्कादायक घटनेमुळे बिहारमधील पूर्णिया जिल्हा हादरून गेला आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–७४ | बुधवार, दि.०९ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# शेतकरी फासावर लटकताय, शासनाकडून फक्त मलमपट्टी!

## शासनाला जाग कधी येणार; २० टक्क्यांनी आत्महत्या वाढल्या

**बीड । प्रतिनिधी**

**कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी पीकविम्याची प्रतिक्षा, कधी बाजारभावाची अनिश्चितता अशा हे संकटांच्या साखळीत अडकलेले शेतकरी शेवटी आयुष्यच संपवतात. गेल्या ६ महिन्यात ५२० शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली असून यात बीड आघाडीवर आहे. तर दुसरीकडे शेतकऱ्यांप्रती शासनाला काहीही सोयरसुतक असल्याचे दिसत नाही.**



राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत असल्याचं वास्तव सरकारने नुकतंच विधान परिषदेत मांडलेल्या आकडेवारीतून स्पष्ट केलंय. या वर्षी जानेवारी ते मार्च २०२५ या अवघ्या ३ महिन्यांच्या कालावधीत राज्यात तब्बल ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिली आहे. विरोधी पक्षाच्या आमदारांनी वाढत्या शेतकरी आत्महत्यांबद्दल प्रश्न उपस्थित केल्यानंतर राज्याचे ◀◀ पान २ वर

### बीडमध्ये सर्वाधिक आत्महत्या

मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपैकी बीड जिल्हा सर्वाधिक आत्महत्या नोंदवलेल्या जिल्ह्यांच्या यादीत पुन्हा पहिल्या क्रमांकावर आहे. जानेवारी ते जून २०२५ दरम्यान बीडमध्ये तब्बल १२६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली, तर मागील वर्षी याच कालावधीत ही संख्या १०१ होती. तर मराठवाड्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये जानेवारी ते जून २०२५ दरम्यान, छत्रपती संभाजीनगर ९२, नांदेड ७४, परभणी ६४, धाराशिव ६३, लातूर ३८, जालना ३२, हिंगोली ३१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

### सरकारकडून फक्त मलमपट्टी

राज्यभरात आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या ३७३ कुटुंबे आर्थिक भरपाईसाठी पात्र असल्याचे आढळून आले आहे. तर २०० कुटुंबांना अपात्र घोषित करण्यात आले, असे राज्याचे मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी विधान परिषदेत शेतकरी आत्महत्यांबाबत विचारलेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात सांगितले. वास्तवात मात्र सरकारकडून शेतकरी आत्महत्यांप्रती ठोस असे पाऊल उचलले जात नसून फक्त मलमपट्टी केली जात आहे.

## थोडक्यात...

### होमिओपॅथिक डॉक्टरांना डॉक्टरांकडून विरोध

लातूर –होमिओपॅथिक डॉक्टरांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल मध्ये नोंदणी करायला डॉक्टरांनी विरोध दर्शविला आहे, यामुळे लोकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. होमिओपॅथी पदवी नंतर सहा महिन्यांचा कोर्स करणाऱ्या डॉक्टरांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल मध्ये नोंदणी करण्याचे आदेश आरोग्य विभागाने दिलेले आहेत.त्या नंतर आता डॉक्टर पुढे येऊन या बाबीचा विरोध करीत आहेत.

### विरोधी पक्षनेते पदासाठी विरोधक आक्रमक

मुंबई–विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद मिळत नसल्याने विरोधक आक्रमक झाल्याचे चित्र आहे. सत्ताधाऱ्यांना विरोधी पक्षांची इतकी भीती का? असा प्रश्न आदित्य ठाकरे यांनी विचारला आहे. राज्यात विरोधकांचा आवाज दाबला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

### अबू आझमींची मनसेवर टीका

मुंबई–मनसेच्या लोकांनी कायद्यांच्या मजाक केला आहे. या आधी टॅक्सी वाल्यानं मारले हत्या झाल्या. मीरा रोडवर दुकानदारला मारले. दुकानदारांनी आंदोलन केले. मनसेचे आंदोलन अनधिकृत आहे. न्यायाधीश येत आहे ते काय म्हणतील काय मजाक लावली आहे, अशी टीका अबू आझमींनी केली आहे.

### नाशिकमधील ७ धरणे पूर्ण भरली

नाशिक –जिल्ह्यात पावसामुळे धरण साठ्यात मोठी वाढ झाली आहे. सध्या गंगापूर धरणातून ६३३६ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामुळे अंदाजे २० टीएमसी पाणी जायकवाडी धरणाकडे सोडण्यात आले आहे. जिल्ह्यातील २३ पैकी ७ धरणे १०० टक्के भरली आहे. यामध्ये भावली, भाम, हरणबारी, वालदेवी, आळंदी, भोजपूर आणि केळझर या धरणांचा समावेश आहे.

### शिर्डीत गुरुपोर्णिमा उत्सवाची जय्यत तयारी

शिर्डी–उत्सावादरम्यान भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता संभाव्य गर्दी लक्षात घेता उत्सवाच्या मुख्य दिवशी गुरूवारी मंदिर रात्रभर दर्शनासाठी खुले राहणार आहे. गुरूवार रात्रीची आणि शुक्रवार पहाटेची काकड आरती रद्द करण्यात आली असून व्हिआयपी ब्रेक दर्शन दिवसभर बंद असणार आहे. उत्सवादरम्यान विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## परळी वैद्यनाथ औष्णिक विद्युत केंद्रातील बंद संचांच्या जागेत उभारणार सौर ऊर्जा प्रकल्प

### धनंजय मुंडे यांच्या प्रश्नावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली विधानसभेत घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

**आज विधानसभेत आ. धनंजय मुंडे यांनी उपस्थित केलेल्या एका तारांकित प्रश्नाच्या उत्तरात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परळी वैद्यनाथ येथील औष्णिक विद्युत केंद्रातील बंद असलेल्या संच क्रमांक १ ते ५ च्या जागेत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्याचे घोषित केले आहे. त्याचबरोबर याच औष्णिक विद्युत केंद्रात शिल्लक असलेल्या जागेत नवीन नवव्या संचाची उभारणी करण्याबाबत काही तांत्रिक अडचणी आहेत, त्यावर आज चर्चा झाली**



**असली तरी या संदर्भात एक व्यापक बैठक घेऊन सकारात्मक मार्ग काढू, असे आश्वासनही श्री फडणवीस यांनी दिले आहे.**


परळीचे आमदार तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी परळी औष्णिक विद्युत केंद्रात निष्कासित करण्यात आलेल्या संच क्रमांक १ ते ५ च्या जागेवर अधिक क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारून त्याद्वारे हरित ऊर्जा निर्मिती केली जावी, त्याचबरोबर संच क्रमांक ८ च्या तुलनेत अधिक वीज निर्मिती क्षमता असलेला संच क्रमांक ९ नव्याने उभारण्यात यावा अशी मागणी आज तारांकीत प्रश्नाव्दारे उपस्थित केली, ◀◀ पान २ वर

## आ.क्षीरसागरांनी महावितरणाचा मुद्दा विधानभवनात गाजवला!

### प्रस्ताव मंजूर होत नाही अन् झाले तर कामे लवकर होत नाहीत; हायटेक कंपनीच्या चौकशीची केली मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

**बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मतदारसंघातील वीज, पाणी, रस्ते, स्वच्छता यासह नागरीकांच्या दैनंदिन अडचणींवर लक्ष केंद्रित केले आहे. अनेकवेळा महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन ही काहीच फरक पडत नसल्याने, सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात प्रश्न उत्तर सत्रात महावितरण कंपनीच्या गलथान कारमाराची**



**चिरफाड केली.**

बीड शहर, बीड ग्रामीण व शिरूर कासार तालुक्यात महावितरणचा गलथान कारभार सुरू आहे. या विरोधात आज आ. संदीप क्षीरसागर यांनी पावसाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करीत महावितरण आणि कॉन्ट्रॅक्टर यांच्या मिलिभगतवर बोट ठेवत चिरफाड केली असून, आधीच प्रस्ताव मंजूर होत नाही आणि झाले तरी काम लवकर पूर्ण होत नाही. तसेच मागील दोन वर्षांपासून आरमोड केबल चे काम पूर्ण न केलेल्या हायटेक कंपनीची चौकशी करावी अशी मागणी केली. आ.क्षीरसागर म्हणाले की, महावितरणचे कोणतेही ◀◀ पान २ वर

## एसटीतील कर्मचाऱ्यांच्या ऑनलाईन बदल्या रखडल्या

**मुंबई । प्रतिनिधी**



**परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी १ जून रोजी एसटीच्या वर्धापनदिनानिमित्त ऑनलाईन बदल्यासंदर्भातील ॲपचे उद्घाटन केले होते. मात्र अद्याप ऑनलाईन बदल्या सुरु झाल्या नसून बदल्या रखडल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे.**

ऑनलाईन बदल्यांचे ॲपचे उद्घाटन झाल्यावर मंत्री सरनाईक यांच्या हस्ते ५० लिपिक–टंकलेखक व ५० सहायक अशा १०० प्रातिनिधिक बदल्या केल्या होत्या. असे असताना आता तांत्रिक अडचणींमुळे बदल्या रखडल्या आहेत. राज्यातील ५ हजारांपेक्षा अधिक बदल्या रखडल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. एसटीच्या चालक–वाहकांपासून अधिकाऱ्यांपर्यंतच्या विनंती बदल्या आता संगणकीय प्रणालीद्वारे ◀◀ पान २ वर

## आ.धसांच्या मुलाच्या गाडीच्या धडकेने एक ठार

### अहिल्यानगर–पुणे महामार्गावरील घटना

**आष्टी । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–पुणे महामार्गावर अपघाताची भीषण घटना घडली असून आ. सुरेश धस यांच्या मुलाच्या गाडीची दुचाकीला धडक बसली आहे. यात दुचाकीस्वराचा मृत्यू झाल्याची घटना दि. ७ जुलै रोजी मध्यरात्रीनंतर घडली आहे.**

भाजपाचे आ. सुरेश धस यांचा मुलगा सागर धस हा अहिल्यानगर–पुणे महामार्गावरुन कारने प्रवास करीत असताना दुचाकीला धडक बसली असल्याचे म्हटले



जात आहे. दुचाकी ही जातेगाव फाट्याकडून येत ◀◀ पान २ वर

## औताला जुंपलेल्या शेतकऱ्याची राष्ट्रीय मानवाधिकारकडून दखल

### जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस जारी; आयोगाने ॲक्शन टेकन रिपोर्ट मागितला

**लातूर । प्रतिनिधी**

**शेतीच्या मशागतीचा खर्च परवडेना म्हणून एका ६५ वर्षीय वृद्ध शेतकऱ्याने स्वत:लाच औताला जुंपल्याचा प्रकार समोर आला होता. या घटनेची दखल राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडून घेण्यात आली आहे. आयोगाने ॲक्शन टेकन रिपोर्ट मागितला आहे.**

शेतीला होणारा खर्च आणि बैल सांभाळण्यासाठी होणारी अडचण पाहता शेतकऱ्याने बैलाऐवजी औताला स्वत:लाच जुंपले होते. हा प्रकार लातूर जिल्ह्यात घडला होता. दरम्यान, आता या घटनेची दखल राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडून घेण्यात आली आहे. मानवाधिकार आयोगाचे सदस्य प्रियांक कानूनगो यांच्या न्यायपीठाकडून लातूर जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस जारी करण्यात आली आहे. मानवाधिकार आयोगाने ॲक्शन टेकन रिपोर्ट मागितला आहे.

## कामगार संघटनांकडून आज भारत बंदची हाक

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात देशातील १० प्रमुख केंद्रीय कामगार संघटनांच्या संयुक्त मंचाने, संलग्न शेतकरी व कामगार संघटनांना सोबत घेऊन, बुधवारी (९ जुलै) भारत बंदची हाक दिली आहे. 'व्यवसाय सुलभते'च्या नावाखाली राबवल्या जाणाऱ्या आर्थिक व कामगार सुधारणांमुळे कामगारांचे हक्क डावलले जात असून, सामूहिक सौदाशक्ती कमकुवत केली जात आहे, असा थेट आरोप या संघटनांनी केला आहे. या आंदोलनात विविध शेतकरी संघटनाही सहभागी होणार आहेत.

ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसच्या अमरजीत कौर यांनी सांगितले की, 'या संपात बँकिंग, विमा, टपाल सेवेसह विविध क्षेत्रांतील २५ कोटींहून अधिक कर्मचाऱ्यांसह देशभरातील शेतकरी आणि ग्रामीण कामगारसुद्धा ◀◀ पान २ वर

## विधीमंडळाने केलेला सत्कार न भुतो न भविष्यती –सरन्यायाधीश भूषण गवई

**मुंबई । प्रतिनिधी**

**या सत्काराचे अनन्य साधारण असे महत्त्व आहे. माझा हा सत्कार महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेने केल्याचे मी समजतो. विधीमंडळाचे आणि माझ्या वडिलांचे ३० वर्षांपासून नाते आहे. याच विधीमंडळाने माझा केलेला सत्कार न भुतो न भविष्यती असा आहे, असे प्रतिपादन भारताचे**



**सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.**

विधीमंडळात मंगळवारी (दि. ८) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. सरन्यायाधीश गवई यांनी महाराष्ट्र गीताच्या ओव्या गाऊन आपल्या भाषणाला सुरूवात केली.
◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०८ जुलै २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १७.०० क्विंटल | २,५११ | २,८४२ | २,६४९ |
| ज्वारी/हायब्रिड : २६.५० क्विंटल | २,३७१ | २,९५१ | २,५२६ |
| मका/लोकल: २.५०क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर : २.५० क्विंटल | ५,९०० | ६,४५० | ६,१७५ |
| उडीद : १.५० क्विंटल | ४,४०० | ४,८०० | ४,६०० |
| बाजरी: ३०.५० क्विंटल | १,९६० | २,७०२ | २,४२९ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन: ४.५० क्विंटल | ४,००० | ४,२०० | ४,१०० |
| हरभरा: ४०.०० क्विंटल | ५,३५१ | ५,५१५ | ५,४५६ |

## राज्यात लवकरच सरकारी मेगाभरती होणार



### मुख्यमंत्री फडणवीस यांची विधानसभेत घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

**गेल्या काही वर्षापासून राज्यात नोकर भरती केली जात नसल्याने तरुणांमध्ये नाराजी होती. आता राज्यात लवकरच सरकारी मेगाभरती केली जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली आहे.**

शासकीय नोकरभरती नसल्याने असंख्य तरुणांमध्ये उत्साह राहिलेला नव्हता. शासकीय नौकरी मिळावी यासाठी तरुण पुणे, मुंबई, नागपूर, संभाजीनगर, कोल्हापुर सारख्या मोठ्या शहरात जावून तयारी करीत असतात. मात्र शासकीय नोकरभरती होत नसल्याने तरुणांनी गावाकडचा रस्ता धरला होता. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनीच शासकीय नोकरभरतीची घोषणा केल्याने तरुणांना दिलासा मिळणार आहे. राज्यातील विविध सरकारी विभागांमधील रिक्त पदांची भरती लवकरच करण्यात येणार असून, यासाठी 'मेगा भरती' जाहीर होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ◀◀ पान २ वर

### "सर्वच विभागातील जागा भरल्या जाणार

शासनाच्या विविध विभागात सध्या मोठ्या प्रमाणात जागा रिक्त असून त्यामुळे जनतेची कामे सुध्दा विलंबाने होत आहेत. फडणवीसांनी नोकरभरतीची घोषणा केल्यामुळे आता राज्यातील शासनाच्या सर्वच विभागातील रिक्त जागा भरण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

cmyk

## अग्रलेख

# एकत्रीकरणाच्या टाळी बाबत अजूनही संभ्रमच

तब्बल २० वर्षानंतर ठाकरे बंधू एकत्र आल्याने राज्यातील राजकारण चांगलेच ढवळून निघाले. ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याने राज्यातील राजकीय समीकरणे कशी बदलतील याच्या चर्चा सुरू झाल्या. शिवसेना ठाकरे गटाकडून उध्दव ठाकरे यांनी मेळाव्यात बोलताना एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठी असे पुढील युतीबाबत स्पष्ट संकेत दिले. शिवसेनेकडून संजय राऊत यांनी देखील युतीबाबत शिवसेनेची भूमिका स्पष्ट केली, मात्र मनसेकडून ना राज ठाकरे ना कोणत्या नेत्याने युतीबाबत स्पष्ट भूमिका अद्याप मांडलेली नाही. उलट राज ठाकरे यांनी मनसेचे पदाधिकारी आणि नेत्यांना युतीबाबत कोणीही बोलू नये, बोलताना आधी मला विचारावे, असे आदेश दिल्याने शिवसेना-मनसे युतीबाबत मोठा व्दिट निर्माण झाला आहे.

तुम्ही एक पाऊल पुढे टाका राज ठाकरे शंभर पाऊल पुढे येईल, असे वक्तव्य राज ठाकरे यांनी उध्दव ठाकरेंना केले होते. मनसेच्या स्थापनेनंतर राज ठाकरे यांनी उध्दव ठाकरेंसोबत युती करण्यासाठी अनेकदा टाळी दिली होती, मात्र त्याला उध्दव ठाकरेंनी म्हणावा तसा प्रतिसाद दिला नसल्याचे राज ठाकरे यांनी आपल्या मुलाखतीतून वारंवार सांगितले. मनसेच्या स्थापनेनंतर २००९ च्या पहिल्याच विधानसभा निवडणूकीत राज यांनी आपले १३ आमदार निवडून आणले, मात्र त्यानंतर झालेल्या कोणत्याच निवडणूकीत राज यांना म्हणावे तसे यश मिळाले नाही. ज्यांना मोठी पदे दिली, आमदार बनवले तेच राज यांना सोडून गेले. मनसे आणि शिवसेनेमुळे मराठी मतांचे होणारे विभाजन याचा दोन्ही पक्षांना मोठा फटका निवडणुकीत बसत होता. त्याचा फायदा हा अप्रत्यक्षपणे इतर पक्षांना होत होता, मुंबईत संजय निरूपम, मिलिंद देवरा, गुरूदास कामत हे केवळ मराठी मतांच्या विभाजनामुळे खासदार झाले. राज - उध्दव यांच्या स्वतंत्र लढण्याने मराठी माणसाचे नुकसान होत असल्याने, या दोघांनी एकत्र येण्यासाठी अनेकांनी पुढाकार घेतला. मात्र काही उपयोग झाला नाही. अखेर ठाकरे ब्रॅन्ड टिकवण्यासाठी आणि मराठी भाषेसाठी ठाकरे बंधू एकत्र आले. एकत्र आल्यानंतर एकत्र राहणार का? याची चर्चा आता सुरू झाली आहे.

उध्दव ठाकरे यांनी युतीचे स्पष्ट संकेत दिले, मात्र राज ठाकरे यांच्याकडून मात्र तसे काही संकेत किंवा स्पष्टता येताना दिसत नाही. त्यामुळे मनसेचे इंजिन शिवसेनेच्या डब्याला लागणार का? हा आता महत्त्वाचा सवाल उपस्थित झाला आहे. राज आणि उध्दव ठाकरे हे जरी मेळाव्यासाठी एकत्र आले असले तरी त्यांच्या मनातील गेल्या २० वर्षातील किंतु परंतु मिटणे गरजेचे आहे. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेला घरघर लागली आहे. मुंबईतील ठाकरेंचे जवळपास ४५ नगरसेवक शिंदे गटात गेले आहेत, तर राज ठाकरे यांच्या पक्षाला गेल्या तीन विधानसभा निवडणूका आणि दोन महापालिका निवडणूकीत समाधानकारक यश मिळत नसताना देखील मनसेचे कार्यकर्त्यांचे केडर मजबूत आहे. पक्ष नेतृत्वाने दिलेला आदेश पाळण्यात आणि त्वरीत रिझल्ट देण्यात आजही मनसेचा एक नंबर लागतो. त्या तुलनेत २५ वर्षे महापालिकेत सत्ता असताना देखील उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेला लागलेली ओहोटी ही कमी होताना दिसत नाही. जेव्हा माणसाकडे यश किर्ती आणि प्रसिध्दी असते त्याच वेळी त्याची खरी कसोटी असते की तो त्याच्या सोबत कोणाला घेतो आणि कोणाचा उध्दार करतो. राज यांनी आपल्या राजकीय कसोटीच्या काळात उध्दव ठाकरेंकडे मैत्रीसाठी हात पुढे केला होता, मात्र उध्दव ठाकरे यांनी प्रतिसाद दिला नाही. आता वेळ बदलली असून उध्दव ठाकरे हे युतीसाठी आतूर झाले असून, राज मात्र स्पष्ट भूमिका घेताना दिसत नाहीत. यामागच्या कारणांचा विचार केला तर, आजही शिवसेनेपेक्षा मनसेचे कार्यकर्ते आक्रमक आहेत. मराठी भाषेचा अपमान करणाऱ्यांना जिथे जिथे चोप मिळाला, तो मनसेच्या कार्यकर्त्यांनी दिला. त्यामुळे प्रादेशिक अस्मिता, मराठी बाणा या विषयांवर जर दोन पक्ष एकत्र येत असतील तर त्यात जी काही रस्त्यावर आंदोलन, निदर्शने होणार आहेत, त्यात मनसेचे कार्यकर्ते हेच आघाडीवर दिसणार आहेत. मात्र फायदा हा उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेला होणार आहे,

विजयी मेळाव्यासाठी एकत्र येणे आणि एखाद्या आंदोलनासाठी एकत्र येणे हे वेगळे आहे. राज ठाकरे यांच्या मनसेचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांच्या पक्षाने गेल्या १९ वर्षात कोणाशीही निवडणूकपूर्व युती केलेली नाही. राज यांनी उध्दव ठाकरेंसोबत युती करू नये म्हणून देखील त्यांच्यावर दबाव आहे, पण तो स्विकारावा का झुगारावा हा त्यांचा मोठा राजकीय निर्णय असणार आहे. राज आणि उध्दव ठाकरे एकत्र लढल्यास मराठी मतांचे विभाजन टळणार आहे. ज्याचा मोठा फायदा ठाकरे बंधूंना होणार आहे, तर मराठी मतांचे एकत्रिकरण होऊन शिंदे गट आणि भाजपसमोर आव्हान उभं राहणार आहे, एवढे मात्र निश्चित.

# जीव गेला तरी चालेल गायरान जमिनी देणार नाही-राजेश घोडे

## दहा जुलै रोजी वडवणी तहसीलवर मोर्चाचे आयोजन

**वडवणी । प्रतिनिधी**

**राज्य सरकार प्रकल्पाच्या नावाखाली गायरान धारकाच्या जमिनी ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत आहे. तरी जिव गेला तरी चालेल पण एक इंचही जमीन घेऊ देणार नाहीत तसेच जमीन गायरानधारकांना जगण्याचे एकमेव साधन असणाऱ्या जमिनी बाळकावणाऱ्या शासनाच्या विरोधात दिनांक दहा जुलै रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसील कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे. असे आवाहन वडवणी येथील आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेच्या वेळी बोलतांना आझाद क्रांती सेनेचे अध्यक्ष राजेशजी घोडे यांनी सांगितले आहे.**




वडवणी येथे आझाद क्रांती सेनेच्या वतीने गायनधारकांच्या आक्रोश मोर्चाचे आयोजन राजेशजी घोडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेले असून यामध्ये गायरान धारकांच्या ताब्यातील व वहिती खालील असलेल्या जमिनीवर कुठलाही प्रकल्प उभा करू नये, गायनधारकांच्या ताब्यातील जमिनी विनाअट नावे करा,गायरान जमिनीचा २०१० चा कायदा करा, सरकारी जमिनीवर पंधरा वर्षांपासून राहत असलेल्या घरा खाली जागा विना अट नावे करा यासह विविध मागण्यासाठी दिनांक १० जुलै रोजी सकाळी ११ वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसील कार्यालय भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले असून या अनुषंगाने वडवणी येथे काल सोमवार रोजी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेच्या वेळी बोलतांना घोडे म्हणाले की वडवणी तालुक्यातील साळिंबा,पुसरा सह तालुक्यातील व जिल्ह्यातील कसत असणाऱ्या गायरान धारकांच्या जमिनी विविध प्रकल्पाच्या नावाखाली ताब्यात घेण्याचा डाव राज्य शासन करत आहे. त्यामुळे आज मित्तीस डोंगर कोसळलेला असून त्यांच्यावर गायरान जमिनी गेल्यावर उपासमारीची वेळ येणार आहे तसेच सन १९७८ पासून गायरान जमिनी नावे करण्याचा आदेश असतांनाही राज्य शासन गायरान जमीनी नावे करण्याऐवजी ताब्यात घेण्याचा सतत प्रयत्न करत आहे. गायरान धारकांवर अन्याय केला जात आहे. त्यामुळे संतापाची लाट उसळलेली आहे. गायरान धारकांच्या न्याय हक्कासाठी वडवणी येथे आयोजित केलेल्या मोर्चामध्ये हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी यावेळी बोलतांना केले. यावेळी या पत्रकार परिषदेला वडवणी तालुका अध्यक्ष महादेव आवाड,वडवणी ग्रामपंचायतचे माजी सदस्य परमेश्वर उजगरे,माजी सरपंच अरुणराव आवाड, ऊसतोड कामगार संघटनेचे तालुका अध्यक्ष लक्ष्मण आवाड,मंगेश शिंदे, विलास कारके, उपाध्यक्ष पिंटू आढागळे, जयदत्त आवाड, माजलगाव तालुका अध्यक्ष अशोक ढगे,यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# परतुरमध्ये इंग्लिश शाळेत पालकांची लूट

**परतूर । प्रतिनिधी**

परतूर शहरात इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू आहेत या शाळांमध्ये कुठल्याही प्रकारचं शासनाच्या परिपत्रकानुसार अंमलबजावणी होताना दिसून येत नाही संस्थाचालकाच्या मनाला वाटेल तेव्हा हे शालेय फीस वाढवतात तसेच कुठल्याही प्रकारची शालेय समिती किंवा शिक्षण विभागाकडून वाढीव फी संदर्भात संदर्भात मान्यता घेत नाहीत तसेच काही ठराविक पालकांना विश्वासात घेऊन फीस वाढवतात तसेच कमिशन बेसवर शाळेचा युनिफॉर्म ज्यावेळेस त्यांच्या मनात येईल तेव्हा बोलतात त्यामुळे पालकांना गणवेशाविषयी भुरुदंड भोगावा लागतो तसेच त्यांच्या मनाप्रमाणेच शालेय अभ्यासक्रम बदलतात खाजगी कंपन्यांचे पाठ्यपुस्तके घेऊन गरीब पालकावर परत अन्याय करतात ज्या शाळांना सीबीएससी ची मान्यता आहे त्यांनी एनसीआरटी चे बुक ठेवावेत ते फार रिजनेबल प्राइस मध्ये आहेत परंतु यांच्या कमिशन साठी हे लोकांवरती खाजगी कंपन्यांचे बुक पालकांवरती लादतात या पुस्तकांची किंमत खूप असते या सीबीएससीच्या पुस्तकांना शिकवण्यासाठी पात्र शिक्षक नसतात सर्व सिल्याबस वर्षभर कंप्लेंट होत नाही आणि स्वतःच पेपर काढून विद्यार्थ्यांना जास्तीचे गुण देऊन हे संस्थाचालक विद्यार्थ्यांना पास करतात तसेच कमिशन साठी विद्यार्थ्यांचा गणवेश बदलला जातो यामागे एकच उद्देश की त्यांना त्याचे कमिशन मिळते संस्थाचालक हे फक्त पैसे कमवण्यासाठी या सगळ्या गोष्टी करते त्यांना कोणत्याही प्रकारची चॅरिटेबल करायचे नाही फक्त कसा पैसा कमवायचा हे त्यांना माहीत आहे हे इंग्रजी माध्यमाच्या जेवढ्या काही शाळा आहेत त्यातील काहींनी फ्रेंचाईजी घेतली आहे परंतु काही शाळांना सीबीएससी ची मान्यता नसताना सीबीएससी चा पाठ्यक्रम राबवत आहेत त्यांच्यावर शासनाने कठोर कठोर करावी करायला पाहिजे अशी मागणी सुज्ञ नागरिकातून होत आहे.

# ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच-ग्रामसेवकांना कोंडले!

**जालना । प्रतिनिधी**

**बदनापूर तालुक्यातील दुधनवाडी ग्रामपंचायत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे संतप्त ग्रामस्थांनी थेट कारवाई करत सरपंच आणि ग्रामसेवकाला ग्रामपंचायत कार्यालयात कोंडून बाहेरून टाळे ठोकले. या प्रकारामुळे गावात एकच खळबळ उडाली आहे.**

गावातील रस्त्यांची दयनीय अवस्था, सांडपाण्याची व्यवस्था नाही, नाल्यांची अभावामुळे रस्ते गटारात परिवर्तित झाले असून नागरिकांना आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अनेक वेळा निवेदनं देऊनही समस्या सुटत नसल्याने अखेर ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला. सकाळपासूनच ग्रामस्थ मोठ्या संख्येने ग्रामपंचायत कार्यालयात जमले. त्यांनी थेट सरपंच व ग्रामसेवकाला आतमध्ये कोंडले आणि दरवाजाला टाळे ठोकले. या आंदोलनामुळे काही वेळ परिसरात तणाव निर्माण झाला होता. ‘आमच्या मागण्या सोडवा, अन्यथा अधिक तीव्र आंदोलन. असा इशारा ग्रामस्थांनी दिला असून प्रशासनाला आता जाग येते की नाही हे पाहावे लागेल.



# बस चालकाला बनावट पिस्टलने धमकावले

## बीड बस स्थानकातील प्रकार; दोघे गजाआड

**बीड । प्रतिनिधी**

**एसटी बस ही बीड येथील बस स्थानकाबाहेर जात असताना दोघांनी बस चालकाला शिवीगाळ करुन बनावट पिस्टल लावून धमकावल्याची घटना दि. ७ जुलै रोजी घडली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल होताच शिवाजीनगर पोलिसांनी सिसिटिव्ही फुटेजच्या आधारे काही तासात दोन्ही आरोपींना गजाआड केले.**

दिनांक ०७/०७/२०२५ रोजी रात्री ८:३० वा. चे सु. बस स्थानक बीड इन गेट जवळ फिर्यादी बस चालक नामे इरफान निजाम शेख वय ३६ वर्षे, व्यवसाय बस चालक रा. नवगण राजुरी ता. जि. बीड हे उभे असतांना सदर ठिकाणी त्यांचे ओळखीचे जगताप यांचे सोबत दोन इसमांनी झटापट करुन शिवीगाळ केली. त्यावेळी सदर फिर्यादी तेथे गेले असता त्यांनी पाहिले की, त्यातील एका जाड तब्बेत असलेल्या व पांढरा शर्ट व निळ्या रंगाची पॅन्ट असलेल्या इसमाने तुझा काय संबंध असे म्हणुन फिर्यादी यांना त्याच्या कंबरेची पिस्तुल काढून धमकावले व त्यानंतर ते त्यांचे जवळील बुलेटवरुन (एमएच२३,७३८७) पळून गेले. वगैरे मजकुराचे फिर्यादी वरुन शिवाजीनगर पोलीस ठाणे, बीड येथे गुन्हा दाखल झाला आहे. यानंतर गुन्ह्याची गांर्भीयाने दखल घेवुन पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी आरोपीचा शोध होणेकामी पोलीस पथक रवाना केले. नमुद पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सी.सी.टि.व्ही. फुटेजची पाहणी करुन त्याद्वारे आरोपी निष्पन्न करुन त्यांचा शोध घेत असतांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आरोपी अभिजीत दिलीपराव जाधव (वय २३ वर्ष रा. पंचशील नगर, बीड) हा नालंदा कॉलनी बीड येथे असलेले बाबत तसेच आरोपी अभिजीत कमलाकर कांबळे हा बीड शहरातील माळीवेस परीसरात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. सदर ठिकाणी दोन पथके रवाना करुन दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. त्यावेळी आरोपी अभिजीत कमलाकर कांबळे याचेकडुन गुन्ह्यात वापरलेली एक लोखंडी पिस्टल जप्त करण्यात आले. सदर पिस्टलची पाहणी केली असता ते बनावट असल्याचे आढळुन आले. तसेच आरोपी यांनी गुन्ह्यात वापरलेली बुलेट जप्त करण्यात आली आहे. यातील आरोपी अभिजीत कमलाकर कांबळे याचे विरुध्द यापुर्वी बीड शहर पोलीस ठाणे येथे जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे.



पान १ वरून...

### शेतकरी फासावर लटकतोय,

मदत आणि पुनर्वसन विभागाचे मंत्री मकरंद पाटील यांनी विधान परिषदेत त्यांच्या लेखी उत्तरात ही आकडेवारी सादर केली. राज्य महसूल विभागाच्या अहवालानुसार, २०२५ च्या पहिल्या सहामाहीत (१ जानेवारी ते २६ जून) तब्बल ५२० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद झाली आहे. ही संख्या २०२४ मधील याच कालावधीतील ४३० आत्महत्यांपेक्षा २० टक्क्यांनी जास्त आहे. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी पीकविम्याची प्रतिक्षा, कधी बाजारभावाची अनिश्चितता अशा हे संकटांच्या साखळीत अडकलेले शेतकरी शेवटी आयुष्यच संपवतात.

-----------

### आ.क्षीरसागरांनी महावितरणाचा

काम असले की, प्रथम आरडीएसएस योजनेचे नाव पुढे केले जाते. या योजनेतून एखादे काम करण्यासाठी प्रस्ताव दाखल केला तरी त्यास लवकर मंजुरी मिळत नाही. मंजुरी मिळाली तर ते काम लवकर होत नाही. माझ्या शहरात १५ सप्टेंबर २०२३ पासून मंजूर असलेले आरमोड के बल टाकण्याचे काम सुरु आहे. दोन वर्ष झाली हे कामच पूर्ण होत नाही. हे काम हायटेक कंपनीकडून करण्यात येत आहे. हा गैरप्रकार महावितरण आणि कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने सुरू आहे. यासोबतच बीड तालुक्यातील पाली येथे ३३/११ के.व्ही. उपकेंद्र मंजूर आहे. परंतु याचे काम सुरू नाही. तसेच ११ के.व्ही. लाईन बदलणे, तसेच जीर्ण तारा बदलने, पोल शिफ्टिंग अशी कामे कधी होणार आहेत? आणि दोन वर्षांपासून केबल टाकण्याचे काम संथगतीने करणाऱ्या हायटेक कंपनीची चौकशी करणार का? असे प्रश्न आ. क्षीरसागर यांनी सभागृहात उपस्थित केले.

**साक्षी कांबळे प्रकरणाचीही चौकशी करण्याची केली मागणी**

बीडमध्ये तीन-चार महिन्यांपूर्वी साक्षी कांबळे या मुलीने आत्महत्या केली होती. छेडछाड आणि मानसिक त्रासाला कंटाळून साक्षी कांबळे हीने आत्महत्या केली होती. या प्रकरणात हलगर्जीपणा करणाऱ्या पोलीस उपाधीक्षक स्वप्नील राठोड यांच्यावर नीलंबनाची कारवाई करण्याची मागणीही आ.संदीप क्षीरसागर सभागृहात केली. यावर गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी कारवाईचे आश्वासन दिले.

-----------

### परळी वैद्यनाथ औष्णिक विद्युत केंद्रातील बंद

त्यास श्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात उत्तर दिले. नवव्या संचाची उभारणी करण्याबाबत धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार शासनाने विचार केला असता, विजेची मागणी, कोळसा खरेदी मधील भावाची तफावत, कोळसा वाहतुकीस लागणारा खर्च आदी तांत्रिक अडचणी असल्याचे श्री फडणवीस यांनी नमूद केले. त्यावरून धनंजय मुंडे यांनी प्रचलित पद्धतीने कोळसा खरेदी करणे ऐवजी वेस्टर्न कोल्डफिल्ड लिमिटेड किंवा महानंदी कोल्डफिल्ड लिमिटेड यांच्याकडून तोच कोळसा कमी दरात उपलब्ध केला जाऊ शकतो, शिवाय आवश्यक जमीन, पाणी आदी सर्व भौतिक सुविधा उपलब्ध असून, याद्वारे मोठ्या प्रमाणात स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे, याकडे सभागृहाचे लक्ष वेधले. यावेळी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सौर ऊर्जा प्रकल्पाच्या उभारणीला मान्यता देत असल्याचे सांगत नवीन नवव्या संचाची उभारणी करणे संदर्भात एक व्यापक बैठक घेऊन त्यात सर्व मुद्दे व तांत्रिक बाबींचा अभ्यास करून, योग्य सकारात्मक निर्णय घेऊ, असे आश्वासन दिले आहे.

**सहा महिन्यांनंतर धनंजय मुंडे सभागृहात बोलले; अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद मांडणी!**

दरम्यान महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर सुमारे सहा महिन्यानंतर धनंजय मुंडे यांनी आज सभागृहात प्रथमच तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून भाषण केले; अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी, संयमी पण प्रखर बोलणे, मुद्द्याशी खिळून राहणे व ठेवणे, सभागृहाचा डेकोरम सांभाळणे या सर्वच बाबींची काळजी घेऊन सभागृह गाजविणारे धनंजय मुंडे आज पुन्हा एकदा पाहायला मिळाले!

-----------

### आ.धसांच्या मुलाच्या

असताना हा अपघात घडला. यामध्ये दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे. नितीन शेळके असे अपघातात मृत झालेल्या दुचाकीस्वराचे नाव आहे. दरम्यान, सुपा पोलीस स्टेशनमध्ये अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

-----------

### एसटीतील कर्मचाऱ्यांच्या

ऑनलाइन पद्धतीने होणार आहेत. विनंती बदलीचे अर्ज ॲपद्वारे भरून घेण्यात येणार आहेत.

-----------

### माजी नगराध्यक्ष अशोक होकेंवर

फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माजलगाव शहर पोलीस सध्या या प्रकरणाचा अधिकचा तपास करत आहेत.

----------

### कामगार संघटनांकडून

सहभागी होण्याची शक्यता आहे. हा बंद सरकारच्या कामगार-विरोधी, शेतकरी-विरोधी आणि राष्ट्र-विरोधी उद्योगपूरक धोरणांच्या निषेधार्थ पुकारण्यात आला आहे. परिणामी बँकिंग, टपाल, कोळसा खाणकाम, कारखाने आणि राज्य परिवहन सेवा प्रभावित होण्याची शक्यता आहे. भारत बंद पुकारणाऱ्या संघटनांनी गेल्या वर्षी श्रममंत्री मनसुख मांडविया यांना १७-कलमी मागण्यांचे निवेदन सादर केले होते. त्यांच्या मते, सरकार गेल्या १० वर्षांपासून वार्षिक श्रम परिषद आयोजित करत नाही आणि कामगार-कर्मचाऱ्यांच्या हिताच्या विरोधात निर्णय घेत आहे. ऐतिहासिकदृष्ट्या, कामगार हक्कांचे नियमन हे केंद्र आणि राज्य स्तरावरील २० हून अधिक विविध कायद्यांद्वारे केले जात होते, ज्यात कामगारांचे हक्क आणि कर्तव्ये यांच्या विभिन्न पैलूंचा समावेश होता. गेल्या पाच वर्षांपासून केंद्र सरकार या सर्व कायद्यांचे एकत्रीकरण करून त्यांच्या संहिता तयार करत आहे, आणि या संहिता चालू वर्षात लागू होण्याची शक्यता आहे. कामगार संघटनांनी यापूर्वीही या संहितांना तीव्र विरोध दर्शवला आहे. त्यांच्या मते, या संहिता उद्योगपूरक असून, त्या कामगारांची एकजूट मोडीत काढणाऱ्या आणि आपल्या हक्कांसाठी एकत्रितपणे आंदोलन करण्याच्या सामूहिक अधिकारावर गदा आणणाऱ्या आहेत, असे कामगार संघटनांचे म्हणणे आहे.

**शेतकरी, कामगार यांनी संप यशस्वी करण्याचे आवाहन**

दहा केंद्रीय कामगार संघटना आणि त्यांच्याशी संलग्न संघटनांच्या संयुक्त मंचाने केंद्र सरकारविरोधात सार्वत्रिक संप पुकारून भारत बंदची हाक दिली आहे. एका निवेदनात या मंचाने ‘राष्ट्रव्यापी सार्वत्रिक संप भव्य यशस्वी’ करण्याचे आवाहन केले आहे. तसेच औपचारिक आणि अनौपचारिक/असंघटित अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रांमधील संघटनांनी याची तयारी जोमाने हाती घेतली असल्याचे म्हटले आहे. ‘देशभरातील शेतकरी आणि ग्रामीण मजूरसुद्धा या आंदोलनात सहभागी होतील,’ अशी माहिती ‘ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस’च्या अमरजीत कौर यांनी दिली.

-----------

### राज्यात लवकरच सरकारी

यांनी विधानसभेत दिली. सर्व विभागांना दीडशे दिवसांत उद्दिष्टपूर्तीचे आदेश देण्यात आले असून, त्यानंतर भरती प्रक्रिया सुरू होणार आहे. अनुसूचित जमातींसाठी राखीव ६ हजार ८६० पदांबाबत कार्यवाही सुरू असून, जात वैधता प्रक्रियेसाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर, तसेच सफाई कामगारांची वारसा हक्काने भरतीही पुन्हा सुरू होणार आहे.

----------

### विधीमंडळाने केलेला सत्कार न

ते म्हणाले की, राजकीय, सामाजिक मतभेद बाजू ठेवून देशाच्या प्रतिष्ठेसाठी आपण सर्वांनी एक झाले पाहिजे. मी नेहमीच भारतीय राज्य घटनेचा विद्यार्थी स्वतःला समजत आलो आहे. राज्यघटना मी १० वी मध्ये असताना माझ्यात मनात रुजली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने राष्ट्रीयत्व असलेले व्यक्ती होते. ते म्हणायचे की, मी पहिला आणि शेवटचा भारतीय आहे. आपला देश एकसंघ ठेवायचा असेल, तर वन नेशन वन सिटीझन हे धोरण ठेवायला पाहिजे. फेड्रॅलिजम जर आपण आणतोय तर ते फ्लेक्सिबल असले पाहिजे. म्हणून जेव्हा केव्हा हा देश एकसंघ कसा राहील, यासाठी घटनेत प्रोव्हिजन केले आहे. भारतीय राज्य घटनेचे तीन स्तंभ आहेत. विधिपालिका, न्याय पालिका आणि कायदेपालिका. घटनेत कायद्याचे पालन करण्याची जबाबदारी विधीमंडळाची आहे, असेही ते म्हणाले. देवेंद्र फडणवीस नागपूरचे महापौर होते. तेव्हा नागरिकांना बेघर होण्यापासून वाचवले. त्याचा जो आनंद असतो, तो कोणत्याही शब्दांत उल्लेख करता येणार नाही. मला आनंद आहे की माझ्या २२ वर्षांच्या कालखंडात एक चांगले न्यायदान करण्याचे काम करता आले. आज आपण सर्वांनी माझा बहुमान केला. हा जो बहुमान आहे, तो एक आशीर्वाद आहे. मी या भूमीला आणि सर्व जनतेला वंदन करतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आपल्या राज्याचे सुपुत्र असलेले भूषण गवई हे देशाचे सर न्यायाधीश झाले, ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

----------



# विठ्ठल नामाचा दिंडीची मिरवणूक उत्सात साजरी

**परतुर । प्रतिनिधी**

परतूर येथील ब्राईट स्टार इंग्लिश शाळेत देवशयनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्माई तसेच वारकऱ्यांची वेश परिधान करून शाळेपासून दिंडीची सुरुवात करण्यात आली. मा.आमदार सुरेशकुमार जेथलिया व त्यांच्या पत्नी मा. नगराध्यक्ष विमलताई जेथलिया यांनी विठ्ठलाच्या पालखीचे पूजन केले.

त्यानंतर दिंडी मोंढा भागातून बालाजी मंदिराला भेट दिली .त्यानंतर मुख्य रस्त्यावर दिंडीसाठी गेहलोत परिवाराने सर्व वारकऱ्यांना शरबत वाटप केले व पालखीची पूजा केली ,त्यानंतर पालखी महादेव चौकातील मंदिरात गेली ,याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी लेझीम चे पथक टाळ मृदंग वाजवत दिंडी पूर्ण केली ,याप्रसंगी शाळेच्या संचालिका श्रीमती योगिता मनवर ,शाळेचे मुख्याध्यापक गणेश शिंदे ,सर्व सहशिक्षक श्रीमती शिंदे मॅडम ,श्री पवार सर, श्री डावखर सर, डावखर मॅडम ,कार्तिका ताजी मॅडम, पूजा मॅडम ,आरती मॅडम ज्योती मॅडम ,मोरे मॅडम,लक्ष्मीबाई ,साठे मामा नंदू, इत्यादींनी परिश्रम घेतले.



बीड : नीट परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवत जिल्ह्याचे नाव उज्वल करणारे धानोरा रोड परिसरातील अनुराग बाबासाहेब मोरे यांचा सत्कार समारंभ आयोजित केला यावेळी उपस्थित शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रतन गुजर, विठ्ठल गुजर, सुनील गुजर, पत्रकार नितेश उपाध्ये यांच्यासह आदी शिवसैनिक उपस्थित होते.


राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. ०९ जुलै २०२५




# महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचा तुघलकी निर्णय

## इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अंबाजोगाई शाखेनं केलं आंदोलन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**इंडियन मेडिकल असोसिएशन अंबाजोगाई शाखेने महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने ३० जून २०२५ रोजी जारी केलेल्या वादग्रस्त अधिसूचनेचा तीव्र निषेध नोंदवला आहे. या अधिसूचनेनुसार, केवळ एका वर्षांचा ब्रिज कोर्स पूर्ण केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांना अलोपॅथीची प्रॅक्टिस करण्याच्या परवानगी सोबतच महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या नोंदणी पुस्तकामध्ये नोंदणीची परवानगी देण्यात आली आहे. इंडिअन मेडिकल असोसिएशनच्या मते, हा निर्णय संपूर्ण आधुनिक वैद्यकीय शिक्षणव्यवस्थेचा व नैतिकतेचा अवमान करणारा असून रूग्णांच्या आरोग्याशी गंभीर धोका निर्माण करणारा आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवार, दिनांक ८ जुलै २०२५ रोजी आय.एम.ए.अंबाजोगाई शाखेच्या वतीने उपजिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.**

या शिष्टमंडळात इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, अंबाजोगाई शाखेचे डॉ.नवनाथ घुगेअध्यक्ष, डॉ.उद्धव शिंदे –सचिव, डॉ.राहुल धाकडे उपाध्यक्ष, डॉ.विजय लाड – उपाध्यक्ष, डॉ.निलेश तोष्णिवाल – सहसचिव, डॉ.अतुल शिंदे – सहसचिव, डॉ.बळीराम मुंडे – सह कोषाध्यक्ष, डॉ.सुनिल जाधव – संस्कृतिक सचिव, डॉ.शिवराज पेस्टे – क्रीडासचिव, डॉ.संदिप जोगदंड – क्रीडा सहसचिव, डॉ.अनिल



भूतडा, डॉ.सचिन पोतदार, डॉ.विवेक मुळे, डॉ.नागोराव डेरनासे यांची प्रमुख उपस्थिती होती. इंडियन मेडिकल असोसिएशन अंबाजोगाई शाखेने यावेळी नागरिकांमध्ये या निर्णयामुळे सामाजिक आरोग्य धोक्यात कसे येईल याविषयी जनजागृती केली. यामध्ये या अधिसूचनेचे दुष्परिणाम स्पष्ट करून शासनाला या निर्णयाविरोधात तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. आय.एम.ए महाराष्ट्र राज्याने यापुढील आंदोलनात्मक कृती जाहीर केली आहे, त्यामध्ये मंगळवार, दिनांक ८ जुलै रोजी राज्यभर उप जिल्हाधिकारी महोदयांना निवेदन देणे, ११ जुलै रोजी २४ तासांची एकदिवसीय आरोग्य सेवा बंद, १९ जुलै रोजी चलो मुंबई भव्य रॅली असे स्वरूप राहणार आहे. यावेळी बोलतांना महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी सरकारने हा तुघलकी निर्णय घेऊन जनतेच्या आरोग्याशी खेळत आहे. सहा वर्षांचा कोर्स जर एका वर्षात पूर्ण होत असेल तर मग एमबीबीएस विद्यार्थ्यांचे पाच वर्षे का वाया घालवित आहेत. सुरक्षित आरोग्य हा जनतेचा मूलभूत अधिकार आहे. आणि तो त्यांना मिळालाच पाहिजे. परंतु, या निर्णयाने या अधिकाराला इजा पोचत आहे. तसेच हे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याने सरकारने लगोलग गडबड करीत ही अधिसूचना काढून न्यायालायचा ही मोठा अवमान केला आहे, यावर संघटना कायदेशीर कारवाई करणार आहे. अस्तित्वात असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयांचा दर्जा वाढवून, सुविधा उपलब्ध करून देऊन, तिथे रिकामी पदे भरून वैद्यकीय जागा वाढविण्याऐवजी सरकार नको ते उद्योग करत डॉक्टर्स कमी आहेत या दुखण्यावर अघोरी उपचार करीत आहे. असे स्पष्टपणे डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. यावेळी बोलताना डॉ नवनाथ घुगे यांनी आहे. की, जर शासनाने सदर अधिसूचना तात्काळ मागे घेतली नाही, तर लोकशाही मार्गाने संपूर्ण राज्यभर आंदोलन छेडले जाईल. तसेच हा अन्यायावर कायदेशीर मार्गाने दाद मागणार आहोत. एका वर्षाच्या कोर्स द्वारे जर असे ज्ञान आकलन होत असेल तर मग सहा वर्षांचा कोर्स सरकारने का ठेवला..? असा सवाल डॉ.घुगे यांनी केला.

## केएसके कृषी महाविद्यालयाच्या कृषी दूतांकडून कृषी दिन साजरा

बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत सौ केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर,के एस के कृषी महाविद्यालय बीड येथील कृषी दुतच्या वतीने कृषी दिन साजरा करण्यात आला. दिनाचा औचित्य साधून हिंगणी हवेली गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये विशेष वसंतराव नाईक यांच्या जयंतीचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यासह शिक्षक वर्गणीही उत्स्फूर्त सहभाग घेतला व वृक्षरोपण प्रात्यक्षिके करण्यात आली कृषी दुतांनी प्रत्येक झाडाचा उपयोग आणि त्याचे फायदे योग्य मार्गदर्शन करून त्यांचे फायदे योग्य पद्धतीने वृक्षरोपण कसे करावे याचे सविस्तर स्पष्टीकरण दिले. या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये वृक्षरोपणाची जाणीव करून देणे जाणीव निर्माण करणे, या कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक अभंग सर, ग्रामस्थ, पालक व ग्रामपंचायत सदस्य ही उपस्थित होते.



सर्वांनी कृषी दुतांचा या उपक्रमाचा कौतुक केले. वृक्षारोपण करणे आजही एक गरज बनली आहे. असे मत कृषी दुत्तने व्यक्त केले.कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे सहसचिव डॉ जी, व्हीं,साळुंखे, डॉ, एस पी मोरे, कार्यक्रम समन्वयक डॉ, एस,टी शिंदे, एल एम बोंद्रे,यांचे मार्गदर्शन लाभले कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना वृक्षरोपणाबद्दल माहिती देण्यात आली व सर्वांना झाडाचे महत्व व त्यांचे फायदे व वृक्षरोपण करणे आजच्या काळात किती महत्त्वाचे आहे एक झाड आपल्याला किती काही देऊ शकत हे सर्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले व त्यांच्या कृषी या विषयाची उमप भरून दिली, असा संदेश देण्यात आला कृषिदूत गुरुदेव गातडे,शरद गायकवाड ,महेश गायकवाड ,कालीगोटा चरण ,तेजस कुलकर्णी , गायकवाड भागवत महेश, कोमटी कृष्ण तेजा या सर्व कृषी दुतानी कार्यक्रमाचे आयोजन केले. त्याबद्दल गावकऱ्यांनी त्यांचे मन भरून कौतुक केले.

## छत्रपती संभाजीनगर विभागातील मत्स्य व्यावसायिकांचा होणार सन्मान

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय मत्स्य शेतकरी दिनाचे औचित्य साधून केंद्र व राज्य शासनाच्या मत्स्यव्यवसाय विषयक विविध योजनांची जनजागृती आणि पुणे व छत्रपती संभाजीनगर द्विविभागस्तरीय मत्स्यव्यावसायिकांचा सन्मान सोहळा शनिवार, १२ जुलै रोजी पुण्यातील कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर येथे आयोजित करण्यात आला आहे. मत्स्यव्यवसाय क्षेत्रामध्ये मत्स्यबीज उत्पादन, मासेमारी, मत्स्यशेती, केज कल्चर, बायोफ्लॉक कल्चर, शोभिवंत मत्स्यव्यवसाय, मत्स्यखाद्य, शितसाखळी, विपणन, नाविन्यपूर्ण मत्स्यउद्योजक, रिव्हर रँन्चिग, मत्स्यपर्यटन, सहकार, सामाजिक, प्रचार–प्रसार या क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणारे अधिकारी, कर्मचारी, व्यक्ती, संस्था, कंपन्या आदींना प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.या कार्यक्रमात विविध योजनांबरोबरच मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा मिळाल्याने होणाऱ्या फायद्यांबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याने जास्तीत जास्त मत्स्यव्यवसायिकांनी कार्यक्रमात सहभाग घ्यावा. अधिक माहितीसाठी ८७८८०९१६४९ व ९६६५६३२७९३ या क्रमाकांवर संपर्क साधवा, असे आवाहन पुणे व छत्रपती संभाजीनगर विभागाचे प्रादेशिक उपायुक्त विजय शिखरे यांनी केले आहे.

# बालकांचे विश्वस्त होऊन त्यांच्या जीवनात सहप्रवासी व्हा..!

## गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व पालक मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे या ब्रीद वाक्याला साक्ष देत येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालयात पालक मेळावा आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यास विद्यार्थी आणि पालकांनी सक्रिय सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे शालेय समिती अध्यक्ष उन्मेष दादा मातेकर, प्रमुख अतिथी म्हणून अमोल मुंडे (वनपरिक्षेत्र अधिकारी), भा.शि.प्र.संस्थेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य राम कुलकर्णी, शाळेचे मुख्याध्यापक शिवाजीराव हेंडगे, प्रगती वर्गाच्या विभागप्रमुख सौ.वर्षाताई मुंडे, पालक मेळावा प्रमुख श्रीधर चौरे हे मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात मंगलमय वातावरणात दीपप्रज्ज्वलन व प्रतिमा पूजनाने झाली. सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक शिवाजीराव हेंडगे यांनी केले. २०२५ – २६ या शैक्षणिक वर्षातील स्पर्धा परीक्षा, त्याची विस्तृत माहिती व नियोजन या विषयी कृष्णा वाघमारे यांनी माहिती सांगितली. कार्यक्रमात शाळेतील ३२ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार गुलाबपुष्प, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करताना संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमले. सत्कारावेळी विद्यार्थी व पालक यांच्या चेहऱ्यावर अभिमानाचे व आनंदाचे तेज



स्पष्टपणे झळकत होते. यावेळी इयत्ता दुसरी ते चौथी मधील एकूण २३६ पालकांची उपस्थिती होती. यानंतर सृष्टी गुट्टे आणि विवेक नाकाडे या विद्यार्थ्यांनी शाळेविषयी मनोगत व्यक्त केले. यानंतर विभागप्रमुख सौ.वर्षा मुंडे यांनी संस्थेच्या ७५ वर्षानिमित्त विद्यार्थी, शाळा हा ऋणानुबंध आत्मियतेचा आहे आणि तो चिरतरूण आहे हे सांगितले. विद्यार्थी शाळेसाठी आणि शाळा विद्यार्थ्यांसाठी कायमची असते हे त्यांनी नमूद केले. यावेळी राम कुलकर्णी यांनी पालकांना संबोधित करताना सांगितले की, पालकांनी आपल्या पाल्यांसमक्ष मोबाईल, टीव्हीचा वापर कमी करून भगवद्गीता, हरिपाठ अशा संस्कारांच्या गोष्टी आपल्या पाल्यांना द्याव्यात, अशी ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यानंतर प्रमुख पाहुणे अमोल मुंडे यांनी विद्यार्थी आणि पालक यांना मौलिक मार्गदर्शन केले. ते म्हणाले, चांगले आई–वडील, चांगली शाळा मिळणारी मुलं ही खूप भाग्यवान असतात. आई–वडिलांनी आपल्या मुलांना विशेष वेळ देणं गरजेचे आहे. जन्माला घातलेल्या बाळाचे आपण मालक नाही तर आपण त्या बालकांचे विश्वस्त आहोत. पालक म्हणून आपण पाल्याच्या आहाराकडे, आरोग्याकडे लक्ष दिलं पाहिजे, तसेच पाल्यांना वेळोवेळी पालक म्हणून विविध क्षेत्र उपलब्ध करून दिली पाहिजेत, असे मत मुंडे यांनी यावेळी व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात उन्मेष दादा मातेकर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करीत सांगितले, स्पर्धा परीक्षेच्या रणांगणात टिकाव धरायचा असेल, तर कठोर परिश्रम, जिद्द आणि आत्मविश्वास हेच शस्त्र असतात. शाळा नेहमीच विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिषेक राजूरकर यांनी, तर गुणवंत विद्यार्थी यादी वाचन परमेश्वर राठोड यांनी केले. वैयक्तिक पद्य राजश्री भारती यांनी सादर केले. तर उपस्थितांचे आभार श्रीधर चौरे यांनी मानले. राजश्री कुलकर्णी यांनी कल्याण मंत्र घेतला आणि कार्यक्रमाची सांगता झाली. पालक, विद्यार्थी व शिक्षक यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत आणि सहकार्याने हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

## यशवंत होळकर विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, पालक मेळावा व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात

**शिरूर कासार । प्रतिनिधी**


**येथील यशवंत होळकर विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, पालक मेळावा व वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक माणिक कातखडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार घोळवे, पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार युवराज सोनवणे, प्रसिद्ध व्यापारी बबन तात्या ढाकणे, भाजपा युवा नेते माऊली पानसंबळ हे उपस्थित होते.यावेळी बोलताना



तहसीलदार घोळवे म्हणाले, ''जगात कोणालाही काहीही फुकट मिळत नाही. यश मिळवायचं असेल तर कठोर परिश्रम करावे लागतात. सध्या 'वेळ नाही' हे कारण विद्यार्थ्यांनी दूर सारावे. ज्ञान मिळवण्यासाठी सतत जागरूक राहावे व अज्ञानाच्या मार्गावर नेणाऱ्यांना ओळखणेही तितकेच महत्त्वाचे आहे.'' कार्यक्रमाची सुरुवात महान नेत्यांच्या प्रतिमांना अभिवादन करून करण्यात आली. विद्यार्थिनींनी सुमधुर स्वागत गीत सादर करून वातावरण भारावून टाकले. कार्यक्रमास कानोबाचीवाडीचे माजी सरपंच बबनराव मोरे, आजिनाथ कदम, नवनाथर सव्वाशे, आजिनाथ गवळी, रंजीत कदम, संतोष सव्वाशे, दादा मोरे, भोंडवे, सुनील चव्हाण, सायकड ज्ञानदेव , सुरेश राऊत, काळे विजय, गंभीरे , श्रीमती ससाने तसेच जायभाय मॅडम यांच्यासह मोठ्या प्रमाणात पालकवर्ग व शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभावी पद्धतीने काळे सर यांनी पार पाडले तर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ गुजर यांनी उपस्थितांचे आभार मानले. वृक्षारोपण उपक्रमाने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत कार्यक्रमाची सांगता झाली.या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये शिक्षण आणि पर्यावरण या बाबत प्रेरणा निर्माण केली असून, पालक–शाळा सुसंवादाचे सुंदर उदाहरण घडले आहे.

## ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच–ग्रामसेवकाला कोंडले!



जालना । प्रतिनिधी

बदनापूर तालुक्यातील दुधनवाडी ग्रामपंचायत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे संतप्त ग्रामस्थांनी थेट कारवाई करत सरपंच आणि ग्रामसेवकाला ग्रामपंचायत कार्यालयात कोंडून बाहेरून टाळे ठोकले. या प्रकारामुळे गावात एकच खळबळ उडाली आहे.

गावातील रस्त्यांची दयनीय अवस्था, सांडपाण्याची व्यवस्था नाही, नाल्यांची अभावामुळे रस्ते गटारात परिवर्तित झाले असून नागरिकांना आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अनेक वेळा निवेदनं देऊनही समस्या सुटत नसल्याने अखेर ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला. सकाळपासूनच ग्रामस्थ मोठ्या संख्येने ग्रामपंचायत कार्यालयात जमले. त्यांनी थेट सरपंच व ग्रामसेवकाला आतमध्ये कोंडले आणि दरवाजाला टाळे ठोकले. या आंदोलनामुळे काही वेळ परिसरात तणाव निर्माण झाला होता. ''आमच्या मागण्या सोडवा, अन्यथा अधिक तीव्र आंदोलन. असा इशारा ग्रामस्थांनी दिला असून प्रशासनाला आता जाग येते की नाही हे पाहावे लागेल.

पान ६ वरून...

### बैलासारखे जूंपून औत ओढणाऱ्या

पाटील त्यांच्या जीवाचे रक्षण करणार आहेत?

पेशवाई अवतरली आहे.

सन २०१४ सालापासून देवेंद्र फडणवीस,उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. याकाळात ऊसदरासाठी चा कायदा अस्तित्वात असताना साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या ऊसाचे हजारो कोटी रुपये बुडविले आहेत.कुठल्याही साखर कारखान्यावर कसलीही कारवाई झालेली नाही. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार दररोज भारतात १४ कोटी लिटर दुधाचे संकलन होते. दररोजचा दुधाचा वापर ६४ कोटी लिटर आहे. दररोज ५० कोटी लिटर नकली दुध तयार होते.याची सगळ्यांना माहीती असूनही दुधाची भेसळ करणाऱ्यांवर कुणीही कारवाई केली नाही. बाजार समित्यांमधून सोयाबीन,कापूस, ज्वारी, बाजरी, मका, उडीद, मूग, तूर,हरभरा, गहू,करडई, जवस, नाचणी,कारळं, सूर्यफूल,भुईमूग आदी. पिकांना आधारभूत किंमत मिळत नाही. बाजार समिती कायद्यात कलम (३२–ड) नुसार आधारभूत किमतीपेक्षा कमी दराने शेतीमालाची खरेदी–विक्री करणे बेकायदेशीर आहे. तरीही कुठल्याही बाजार समितीवर कसलीही कारवाई झालेली नाही. याबाबत आमदार, खासदारांची दातखिळ बसलेली आहे.

राज्यातील विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या, बिगर शेती पतसंस्था,नागरी पतसंस्था,सहकारी बँका आणि राष्ट्रीयीकृत,खाजगी, ग्रामीण बँका अव्वाच्या सव्वा व्याजाची आकारणी करीत आहेत. राज्य सरकारने पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना सुरू केली. शेतकऱ्यांना ( ०%)झिरो टक्के व्याजाने पीक कर्ज दिल्याचा बोभाटा केला. सगळ्या बँकांनी दुहेरी व्याज वसुली केली आहे. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या जिल्ह्यातील लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने तर शेतकऱ्यांची सक्तीने वसुली केली. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली नाही. मल्टीस्टेट,अर्बन निधी, फायनान्स यांनी खाजगी सावकारांना लाजवेल असा धुडगूस घातला आहे. राज्यातील बँक किंवा पतपेढीवर कसलीही कारवाई केलेली नाही.नकली देशी–विदेशी दारू,ड्रग्स,अफीम,चरस,गांजा, हायब्रीड गांजा,अफू अशी नशेची पदार्थ खेड्यापाड्यातून सहज उपलब्ध होत आहेत. कफ सिरपच्या नावाखाली खुलेआम नशेचे पदार्थ विकले जात आहेत.राज्याचे पोलीस वाळू,खडी,मुरूम,गायी,बैलांच्या, माणसाच्या वाहतुकीचे हप्ते वसुली करण्यात गुंतलेले आहेत. शिक्षणसंस्था मधून होणारा गैरकारभार बघायला कुणालाही फुरसत नाही. जिल्हा परिषदेच्या शाळा ओस पडल्या तरीही शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे दर महिन्याला वेळेवर पगार होत असतात.अशी सगळीकडे मौज–मजा सुरू आहे. सरकारी नोकरदार,आमदार, खासदार,मंत्र्यांचे पगार, भत्ते आपोआप वाढवून मिळत आहेत. महाराष्ट्रात साक्षात पेशवाई नांदत असताना शेतीमालाला निर्यातबंदी आणि बेसुमार आयात करून शेतीमालाचे भाव पाडले जात आहेत.दररोज सुमारे १५ शेतकरी आत्महत्या करुन जीवन संपवित आहेत.हाडोळती जि.लातूर येथील वयोवृद्ध अंबादासराव आणि मुक्ताबाई पवार यांच्यासारखे शेतकरी उत्पादन खर्च कमी करण्यासाठी बैलांच्या जागी स्वतः औताला जूंपून प्रयत्न करीत आहेत.त्यांनी उपस्थित केलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जमुक्ती (कर्जमाफी नव्हे)आणि शेतीमालाच्या रास्त भावाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करण्याचा हलकटपणा कधी थांबणार आहे?

### शिक्षकांचे निवृत्ती विषयक

दोन–तीन महिन्याच्या आत पूर्णपणे टप्या – टप्या ने दिली जातील असे संचालक व संबंधित विभागाचे प्रशासन अधिकारी यांच्याकडून शिष्टमंडळास सांगितले गेले . परंतू एकटप्यात तात्काळ थकित रक्कम देण्याची संघटनेने प्रशासनाकडे मागणी केली . संघटनेच्या मागणीनुसार जुलै अखेरपर्यंत प्रलंबित असणारे सेवानिवृत्तांचे अंशराशीकरण व उपदान यासाठी वित्त तरतूद केली नाही तर १५ ऑगस्ट २०२५ रोजी संघटनेच्या वतीने शिक्षण संचालक कार्यालय पुणे येथे आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिलेला आहे . निवेदनाच्या प्रती माननीय अजितदादा पवार साहेब उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री, मा. शिक्षण सचिव , मा . शिक्षण आयुक्त पुणे यांना दिलेल्या आहेत .सदरील शिष्टमंडळामध्ये राज्य अध्यक्ष: अनिल जाधवर, महासचिव :सुभाष जगताप, उपाध्यक्ष: अभिजीत तांदळे, भगीरथ मस्के हे उपस्थित होते .

### राडी तांडा व शिवारातील

रसायन असा एकूण ६७ हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला आहे. यावेळी दारू उत्पादन करणाऱ्या रमेश उत्तम आडे आणि भीमराव दत्ता चव्हाण (दोन्ही रा. राडी तांडा, ता. अंबाजोगाई) या दोघांवर पो.ह. कल्याण देशमाने आणि पो.ह. विवेकानंद सोळंके यांच्या फिर्यादीनुसार ग्रामीण ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर अधीक्षक चेतना तिडके, डीवायएसपी अनिल चोरमले, पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि भताने, सफौ नन्नवरे, पोह कल्याण देशमाने, किसन घोळवे, जगजीवन करवंदे, महेश भागवत, विवेकानंद सोळंके, रवींद्र शिंदे, महिला पोह सुनिता दहिवाडे, प्रतिभा धपाटे, पोअ बापू राऊत व शुभम राऊत यांनी संयुक्तपणे केली. गावपातळीवरील बेकायदेशीर दारू अड्ड्यांवर पोलिसांची कारवाई पुढेही सुरूच राहणार असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

### :: जाहीर प्रगटन ::

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचीत करणेत येते की, आमचे पक्षकार नामे शरद महादेव धन्वे रा. क्रांती नगर बीड ता जि.बीड यांनी खालील वर्णनातील प्लॉट / मिळकत मालक व कब्जेदार रुक्मीनबाई छगनराव जाधव रा. नालंदा कॉलनी पंचशील नगर बीड ता.जि. बीड यांच्या मालकी व ताब्यातील प्लॉट जाहीर प्रगटन देणार यांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचा ठराव केला असून प्लॉट/मिळकत मालकांनी सदर प्लॉट निर्विवाद असल्याचा विश्वास व भरवासा दिला आहे. सदरील प्लॉटचे खरेदीखत दस्त क्र.३६४४/२००९ दिनांक ०४/०९/२००९ हे गहाळ झालेले आहे.

या उपर सदर प्लॉट/मिळकती बाबत कोणाचे काही हितसंबंध, दान, गहाण, तारण, बक्षीस, कर्ज, वारस हक्क, देवाण घेवाण, चोळी बांगडी, मुखत्यारपत्र, इसारपावती वा अन्य आक्षेप असतील तर संबंधितांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राचे पुराव्यासह खालील पत्यावर आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणाचेही आक्षेप न आल्यास सदर प्लॉट निर्विवाद असल्याचे ग्राह्य धरून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी,

सबब हे जाहिर प्रगटन.

बीड

दिनांक : ०८/०७/२०२५

**मार्फत**
**ॲड . विद्या गायकवाड**
**बी. ए. एल.एल.बी**

**जाहीर प्रगटन देणार**
**शरद महादेव धन्वे**
**क्रांतीनगर, बीड ता.जि.बीड**




# केंद्र सरकारने शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी करावा

## पणन मंत्र्यांची केंद्राकडे मागणी

पुणे : महाराष्ट्रातील शेतकरी मोठया प्रमाणावर कांदा पिकाचे उत्पन्न घेतात. कृषी उत्पन्न बाजार समितीतून केंद्र सरकारने शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी करावी. अशी मागणी राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केंद्रीय अन्न व ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या सोबत झालेल्या बैठकीत केली.

अवकाळी पावसात कांद्याचे अतोनात नुकसान झाले आहे. शिवाय कांद्याला मिळणारा दर असमाधानकारक असल्याचे चित्र आहे. शिवाय बांग्लादेशासह इतर देशांना जाणारी निर्यात देखील बंद आहे. त्यामुळे बाजार समितीतून ३ हजार क्विंटलने कांदा खरेदी करावी, शिवाय अनुदान दिले पाहिजे. अशा मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेने पणन मंत्री जयकुमार रावल यांना दिले होते. त्या अनुषंगाने मंत्री रावल यांनी दिल्लीत केंद्रीय मंत्री जोशी यांच्याशी चर्चा करत हा मुद्दा मांडला. तसेच २०२५-२६ मध्ये ६ लाख मेट्रिक टन कांदा थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करून डिबिटी प्रणालीद्वारे पैसे थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावेत. ही खरेदी प्रक्रिया पारदर्शकरित्या व्हावी, यासाठी स्वतंत्र लेखापरीक्षक पथकाची नेमणूक करावी. यासह किरकोळ बाजारात कांद्याचा दर ४०-४५ रुपये किलोपर्यंत गेला तरच निर्यात शुल्क लावावे, जेणेकरून आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धात्मक दर मिळू शकेल. या प्रमुख मागाण्या करण्यात आल्या.

### शेतकऱ्यांचे नुकसान टाळावे

केंद्र सरकारने थेट शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करावी, एफपीओच्या किंवा कुठल्याही मध्यस्थ यंत्रणेद्वारा खरेदी करू नये. अशा खरेदी प्रक्रियेत मोठा घोटाळा होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होते. गेल्या काळात असे अनेक प्रकार घडले आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने थेट कृषी उत्पन्न बाजार समिती तून शेतकऱ्यांच्या कांद्याची खरेदी करावी. अशी मागणी राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या राज्य सरकारकडे केली होती.



# सोयाबीन पिकातील तणांचा असा करा बंदोबस्त



सोयाबीन पिकामध्ये उगवणारे तण पिकाच्या वाढीवर परिणाम करतात आणि त्यातील पोषक घटक आणि पाण्याचा वापर करतात, ज्यामुळे प्रति एकर उत्पादन कमी होते. सोयाबीनमधील तण नियंत्रित करण्यासाठी, प्रभावी औषधांचा वापर आणि त्यांचे योग्य डोस जाणून घेणे आपल्यासाठी महत्वाचे आहे.

सोयाबीन लागवडीतील तणांचे नियंत्रण हे शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक काम आहे. सोयाबीन पिकातील तण नष्ट करण्यासाठी शेतकरी अनेक प्रकारची तणनाशके खरेदी करून फवारणी करतात. परंतु तरीही सर्व प्रकारच्या तणांचे पूर्णपणे नियंत्रण करता येत नाही. सोयाबीन पिकामध्ये उगवणारे तण पिकाच्या वाढीवर पोषक तत्वे आणि पाण्याचा वापर करून प्रभावित करतात, ज्यामुळे प्रति एकर उत्पादन कमी होते. सोयाबीनमधील तण नियंत्रित करण्यासाठी, प्रभावी औषधांचा वापर आणि त्यांचे योग्य डोस जाणून घेणे महत्वाचे आहे.

या औषधांची शिफारस : उभ्या सोयाबीन पिकात तण नियंत्रणासाठी इमाजठियापर १० ईसी. किंवा क्युरोलोफॉस ५ ईसी. प्रति हेक्टरी फवारणी करावी. सध्या सोयाबीनमध्ये पिवळा मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव झपाट्याने होत आहे. शेतकऱ्यांनी रोगग्रस्त झाडे उपटून टाकावीत व इमिडाक्लोप्रिड २५० मिली प्रति हेक्टरी फवारावे.

सोयाबीन पिकासाठी सल्ला : तण नियंत्रणासाठी इमागाथापर १० ईसी. किंवा कल्फॉस ५ ई.सी. प्रति हेक्टरी फवारणी करावी. पिवळ्या मोझॅक रोगाने बाधित झाडे उपटून टाका आणि इमिडाक्लोप्रिड २५० मि.ली. फवारणी करावी. पीक संरक्षण आणि चांगल्या उत्पादनासाठी या उपायांचा अवलंब करा.

अशी घ्या खबरदारी : प्रत्येक तणनाशक रसायनाच्या कंटेनरवर लिहिलेल्या सूचना आणि त्यासोबतच्या सूचना काळजीपूर्वक वाचा आणि त्यामध्ये दिलेल्या प्रक्रियेचे योग्य पालन करा. तणनाशक रसायनांची योग्य वेळी फवारणी करावी. वेळेपूर्वी किंवा नंतर फवारणी केल्यास नफ्याऐवजी नुकसान होण्याची शक्यता असते. तणनाशकांची फवारणी संपूर्ण शेतात समान प्रमाणात करावी. जोरदार वारा वाहत असताना तणनाशकाची फवारणी करू नये. जेव्हा हवामान स्वच्छ असेल तेव्हाच फवारणी करण्याचा सल्ला दिला जातो.

# बीटी कपाशी पिकासाठी खत व्यवस्थापन

कपाशी हे पीक रासायनिक खतांच्या मात्रांना चांगला प्रतिसाद देते. सध्या बहुतांश शेतकरीवापरत असलेल्या सुधारित बीटी वाणांमध्ये अन्नद्रव्ये वापरण्याची कार्यक्षमताही अधिक आहे. बीटी कपाशीमध्ये विशेषतः सुरुवातीच्या बहराचे अधिक प्रमाणात बोंडात रूपांतर होते. या वेगाने होणाऱ्या वाढीसाठी आणि अधिक बोंडे चांगल्या प्रकारे पोसावीत, यासाठी पिकाला आवश्यक ती सर्व अन्नद्रव्ये दिली पाहिजेत. अन्यथा अन्नद्रव्यांचे प्रमाण कमी पडून पातेगळ होते.

खतांच्या व्यवस्थापनापूर्वी मातीचे परीक्षण करून मातीतील अन्नद्रव्यांचे प्रमाण जाणून घ्यावे. विद्यापीठाने शिफारशीचा आधार घेत नत्र, स्फुरद आणि पालाश या प्रमुख अन्नद्रव्येयुक्त खताचे प्रमाण ठरवावे. पीक वाढीच्या विविध अवस्थांमध्ये त्यांची योग्य मात्रा देणे आवश्यक आहे. माती परीक्षणामध्ये जमिनीत ज्या सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असेल, तिथे आवश्यकतेनुसार झिंक सल्फेट २० किलो, मॅग्नेशिअम सल्फेट २० किलो आणि बोरॉन ५ किलो प्रति हेक्टर प्रमाणे जमिनीत मिसळावे.

नत्र : आवश्यक पण जास्त संवेदनशील अन्नद्रव्य असून, त्याचा वापर सर्वच पिकांत सर्वाधिक प्रमाणात करावा लागतो. कपाशीमध्येही नत्र अधिक प्रमाणात वापरावे लागते. पण हे अन्नद्रव्य संवेदनशील असल्याने त्याचे योग्य व्यवस्थापन करणे थोडे कठीण असते. नत्राची कमतरता झाल्यास पाने लहान राहतात, फुलांची संख्या कमी होते, पातेगळ, बोंडगळ होते, तंतूची गुणवत्ता कमी होते, पाण्याचे आणि इतर अन्नद्रव्यांचे शोषण मर्यादित होते. एकूणच कमी नत्र मिळाल्याने कापूस उत्पादनात घट होते.

सुरुवातीला खूप जास्त नत्र दिल्यास झाडांची शाकीय वाढ जास्त होते, बोंडधारणा कमी होते, पीक परिपक्व होण्यास उशीर होतो, कीड व रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. म्हणजेच प्रमाणापेक्षा जास्त नत्र दिले तरी कापूस उत्पादनात घट होते. कपाशीच्या वाढीच्या विविध टप्प्यांनुसार नत्राची गरज बदलत जाते. सुरुवातीच्या काळात नत्राची गरज कमी असते, पण फळधारणेच्या काळात नत्राची मागणी सर्वाधिक असते. त्यामुळे नत्र खतांचा संतुलित डोस तीन हप्त्यामध्ये विभागून दिल्यास पिकांची चांगली वाढ होते.

खतांची शिफारस : कोरडवाहू बीटी कपाशी : शेवटच्या वखरणीच्या आधी प्रति एकर ५ टन चांगले कुजलेले शेणखत टाकावे. अन्नद्रव्यांची शिफारस (प्रति एकर) : नत्र ४८ किलो, स्फुरद २४ किलो, पालाश २४ किलो

खतांची विभागणी : नत्र : ४० % पेरणीच्या वेळी (१९ किलो), ३० % एक महिन्यानंतर (१४ किलो), ३० % दोन महिन्यानंतर (१४ किलो). स्फुरद व पालाश : संपूर्ण मात्रा पेरणीच्या वेळीच द्यावी.

बागायती बीटी कपाशी : शेवटच्या वखरणीच्या आधी प्रति एकर १० टन चांगले कुजलेले शेणखत टाकावे. अन्नद्रव्यांची शिफारस (प्रति एकर) : नत्र ६० किलो, स्फुरद ३० किलो, पालाश ३० किलो

खतांची विभागणी : नत्र : २०% पेरणीच्या वेळी (१२ किलो), ४० % एक महिन्यानंतर (२४ किलो), ४० टक्के दोन महिन्यांनंतर (२४ किलो). स्फुरद व पालाश : संपूर्ण मात्रा पेरणीच्या वेळीच द्यावी.




# वेलवर्गीय काशीफळाची लागवड

पूर्वी परसबागेत किंवा शेतात कुठेतरी बांधावर, कोपऱ्यातील मोकळ्या जागेत काशीफळाच्या एक दोन वेलीची लागवड केली जाई. बहुतांश वेळी आपोआप बिया पडून उगवून येणारे हे दुर्लक्षित वेलवर्गीय वनस्पती आहे. पण गेल्या काही वर्षापासून उपयुक्त खाद्य म्हणून विशेष करून शेतामध्ये लागवड होऊ लागली आहे.

जाती : काशीफळाच्या जवळपास ३० प्रजातींपैकी कुकुरबिटा पेपो, कुकुरबिटा मोशाटा, कुकुरबिटा मॅक्सिमा, कुकुरबिटा अग्रीरोस्पर्मा, कुकुरबिटा फिसिफोलिया या जातींची लागवड केली जाते. रंगाने आणि आकाराने वेगवेगळ्या प्रजाती काशीफळ पिकात उपलब्ध आहेत. याशिवाय सुधारित वाण दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्थेने पुसा विश्वास या जातीची शिफारस केली आहे. पुसा विकास, पुसा हायब्रीड १, अर्का सूर्यमुखी, अर्का चंदन, काशी हरित, काशी शिशिर एफ, आनंद पंपकीन १, को १, को २ या जातीही उपलब्ध आहेत. याशिवाय १ किलोपासून ३०-३५ किलो वजनापर्यंत वाढणारे काळा, मोठा गर्द हिरवा, मोठा गोल, चपटा हिरवा, पिवळा, लाल अशा विविध प्रकारांच्या काशीफळाचे संकरित वाण उपलब्ध आहेत.

हवामान : सुरुवातीच्या काळात चांगल्या वाढीसाठी किमान १८ अंश सेल्सिअस तापमान गरजेचे आहे. या पिकास उष्ण हवामान चांगले मानवते. वाढलेली थंडी या पिकाला उपयुक्त ठरते.







सरासरी तापमान २५-३५ अंश सेल्सिअस लागवडीसाठी उपयुक्त आहे. कमाल तापमान ४० अंशापर्यंत, तर किमान १८ अंशांपर्यंत असावे. जास्त तापमानात नर फुलांची संख्या वाढून मादी फुलांची संख्या कमी होते. त्यामुळे उत्पादनामध्ये घट येते.

लागवडीसाठी हंगाम : उन्हाळी हंगामात जानेवारी ते मार्च दरम्यान लागवड केली जाते. तर खरीप हंगामात जून-जुलैमध्ये २ ते ३ चांगला पाऊस झाल्यानंतर लागवड करावी.उन्हाळी हंगामाच्या तुलनेत खरीप हंगामात अधिक उत्पादन मिळते. रब्बी हंगामामध्ये तुलनेने उत्पादन कमी येते. अशी लागवड फायदेशीर ठरत नाही. हरितगृहामध्ये नियंत्रित वातावरणामध्ये रब्बीतही लागवड करणे शक्य आहे.

लागवडीचे अंतर : जमिनीचा पोत बघून दोन ओळींतील अंतर ६ किंवा ८ फूट आणि दोन वेलींतील अंतर ३ किंवा २ फूट ठेवावे. बियाणे २ ते २.५ सेंमी पेक्षा जास्त खोल टोकू नये. हलकी ते मध्यम स्वरूपाची पोयटा माती, सेंद्रिय पदार्थ युक्त व निचऱ्याची जमीन चांगल्या वाढीस उपयुक्त आहे. जमिनीचा सामू ६-७ पर्यंत असावा.

काढणी : हे पीक १०० ते १२० दिवसात तयार होते. दोन अवस्थांमध्ये काशीफळांची काढणी केली जाते. अपरिपक्व फळ हे भाजीसाठी वापरतात. पूर्ण परिपक्व झालेले फळ हे गोड पदार्थ व जास्त दिवस साठवून ठेवण्यासाठी वापरले जाते. साधारणपणे ९० दिवसांपासून विविध वाणांची फळे काढणीस येतात. पिकाची काढणी जातिपरत्वे पिकाचा कालावधी पूर्ण झाल्यावर करावी. काढणी करताना फळाला १ इंच देठ ठेऊन तोडणी करावी.

उत्पादन : २० ते ४५ टन प्रति हेक्टर. वेगवेगळ्या प्रकारच्या फळानुसार दर मिळतो. एका वेलीवर दोन फळ अशाप्रकारे नियोजन केल्यास फळांचे वजन चांगले मिळते. जितके जास्त वजन तितकी अधिक मागणी बाजारपेठेमध्ये असते. स्थानिक बाजारांसोबत अन्य राज्यातील व्यापाऱ्याकडूनही मोठ्या प्रमाणात व वर्षभर मागणी असते.




### महत्वाच्या घटना

१८७३ : मुंबई शेअर बाजार एका वडाच्या झाडाखाली सुरू झाला.
१८७४ : इंग्लंडमधील हाऊस ऑफ कॉमन्समध्ये मांजर शिरल्यामुळे सभागृहाचे कामकाज थांबले.
१८७५ : भारतातील पहिला स्टॉक एक्सचेंज म्हणजेच मुंबई स्टॉक एक्सचेंज ची स्थापना मुंबईतील दलात स्ट्रीट येथे करण्यात आली.
१८७७ : विंबल्डन चॅम्पियनशिप सुरु झाली.
१८८९ : अमेरिकेतील प्रसिद्ध वर्तमानपत्र द वॉल स्ट्रीट चे प्रकाशन करण्यात आले.
१८९३ : डॉ. डॅनियल हेल यांनी जगातील पहिली 'ओपन हार्ट' शस्त्रक्रिया शिकागो येथे यशस्वी केली.
१९४४ : ब्रिटीशांच्या राजवटीपासून भारताला स्वतंत्र करण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेचे नेतृत्व स्वीकारले.
१९५१ : भारताची पहिली पंचवार्षिक योजना प्रसिद्ध करण्यात आली.
१९६९ : वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी घोषित करण्यात आला.
१९९१ : दक्षिण आफ्रिका देशाला ऑलिम्पिकमध्ये सहभाग घेण्यास पुन्हा परवानगी मिळाली.
२००० : अमेरिकेच्या पीट सॅम्प्रसने ऑस्ट्रेलियाच्या पॅट्रिक राफ्टरचे आव्हान मोडून काढीत विम्बल्डन टेनिस स्पर्धा सातव्यांदा जिंकली. त्याबरोबरच सॅम्प्रसने आपल्या कारकिर्दीतील तेरावे ग्रँड स्लॅम विजेतेपद पटकावून रॉय इमर्सन यांचा बारा ग्रँड स्लॅम विजेतेपदांचा विक्रम मागे टाकला.
२०११ : सुदान राष्ट्रातून दक्षिण सुदान या नवीन देशाची निर्मिती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६८९ : फ्रेंच लेखक ॲलेक्सिस पिरॉन यांचा जन्म.
१७२१ : जर्मन लेखक योहान निकोलॉस गोत्झ यांचा जन्म.
१८१९ : एलियास होवे शिवणयंत्राचा संशोधक (मृत्यू: ३ आक्टोबर १८६७)
१८४५ : साली ब्रिटीश कालीन भारतातील सन १९०५-१९१० काळातील व्हाईसरॉय आणि भारताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड मिण्टो द्वितीय यांचा जन्मदिन.
१९०० : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राजकारणी व माजी संसदीय कार्यमंत्री तसचं, मध्यप्रदेश राज्याचे माजी राज्यपाल सत्य नारायण सिन्हा यांचा जन्मदिन.
१९२१ : रामभाऊ म्हाळगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक, जनसंघ या राजकीय पक्षाचे महाराष्ट्राचे पहिले सरचिटणीस आणि विधानसभेतील पहिले आमदार, तसेच भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्राचे पहिले प्रादेशिक अध्यक्ष (मृत्यू: ६ मार्च १९८२)
१९२५ : वसंतकुमार शिवशंकर पदुकोण ऊर्फ 'गुरू दत्त' प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते. त्यांचे 'चौदहवी का चांद', 'कागज के फूल', 'सीआयडी', 'मि. अंड मिसेस ५५', 'आरपार' आणि 'प्यासा' इ. चित्रपट लोकप्रिय ठरले. त्यांच्या 'साहिब बिबी और गुलाम' या चित्रपटाला राष्ट्रपतीपदक मिळाले. (मृत्यू: १० आक्टोबर १९६४)
१९२६ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ बेन मॉटलसन यांचा जन्म.
१९३० : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथालेखक के. बालाचंदर यांचा जन्म. (मृत्यू: २३ डिसेंबर २०१४)
१९३८ : हरी जरीवाला ऊर्फ 'संजीव कुमार' रुपेरी चित्रसृष्टी निखळ अभिनयाच्या जोरावर गाजवणारे कसदार अभिनेते (मृत्यू: ६ नोव्हेंबर १९८५)
१९४४ : भारतीय-इंग्रजी इतिहासकार आणि शैक्षणिक जूडिथ एम. ब्राउन यांचा जन्म.
१९५० : युक्रेन चे पंतप्रधान व्हिक्टर यानुकोविच यांचा जन्म.
१९७१ : नेटस्केप चे सहसंस्थापक मार्क अँडरसन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५६ : ॲमेडीओ ॲव्होगॅड्रो इटालियन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ९ ऑगस्ट १७७६)
१८६५ : इटलीचे महान रसायनशास्त्रज्ञ अमेडिओ अवोगॅड्रो यांचे निधन.
१९१० : व्हिक्टोरिया क्रॉसचा प्राप्तकर्ता ब्रिटीश सैन्य अधिकारी मेजर जॉर्ज मुरे रोलँड यांचे निधन.
१९३२ : किंग कँप जिलेट अमेरिकन संशोधक व उद्योजक (जन्म: ५ जानेवारी १८५५)
१९४४ : युद्धप्रसंगी राष्ट्रकुल सैन्याला पुरविल्या जाणार्या सेवाप्रसंगी शत्रूच्या सामन्यात शौर्याचा सर्वात उच्च आणि प्रतिष्ठित पुरस्कार व्हिक्टोरिया क्रॉसचे विजेता फ्रँक गेराल्ड ब्लॅकर यांचे निधन.
१९६८ : ह. भ. प. शंकर वामन तथा 'सोनोपंत' दांडेकर स. प. महाविद्यालयाचे माजी प्राचार्य तत्वज्ञानाचे प्राध्यापक व प्रवचनकार, महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे प्रणेते (जन्म: २० एप्रिल १८९६)
१९९३ : संगीतकार व वाद्यवृंद संयोजक या सोनिक-ओमी (काका-पुतणे) जोडीतील सोनिक यांचे निधन (जन्म:)
२००५ : डॉ. रफिक झकारिया महाराष्ट्राचे नगरविकासमंत्री आणि लोकसभा सदस्य (जन्म: ५ एप्रिल १९२०)
२००५ : प्रसिद्ध इराणी भाषांतरकार, संपादक, कोशकार आणि सहित्यीक समिक्षक करीम इमामी यांचे निधन.

# लोकलढा अभ्यास गटाची उजणी धरण, जलसेतू येथे भेट

बीड। प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील लोकलढा आंदोलनातील शेतकरी अभ्यास गटाने उजणी धरण व त्यावरील पाट योजनांना भेट देऊन माहिती घेतली. शेतीसाठी पाण्याचा दुष्काळ दूर करून आपली शेती बारामती पॅटर्न प्रमाणे पाणीदार करण्यासाठी अशा योजना व्हाव्यात यासाठी जनजागृती व शासनाकडे मागणी हा अभ्यासगट करणार आहे.

जायकवाडी धरणाचे पाणी बीड जिल्ह्यातील वंचित भागाला मिळावे, यासाठी लोकलढा आंदोलन गेल्या दीड वर्षापासून सतत संघर्ष करत असून शासनाकडे पाठपुरावाही करत आहे. टेंभूर्णी येथील उजणी धरणामुळे लाखो एकर जमीन पाण्याखाली आली आहे. हे धरण व त्यावरील पाट योजनांमुळे लाखो एकरवर ऊस, फळबागा तर आहेतच शिवाय दूध उत्पादन, रेशीम उद्योग व इतर उद्योगांमुळे हा परिसर विकसित झाला आहे. या भागातील शेतकरी आर्थिक दृष्ट्या सक्षम आहे. लोकलढा आंदोलनात या सर्व योजनांचा उल्लेख अनेकवेळा आपल्याकडील ऊसतोड मजूरांनी केला होता. याच अनुषंगाने लोकलढा आंदोलनाने उजणी धरण व त्यावरील



पाट योजनांचा अभ्यास दौरा केला. या अभ्यास गटामध्ये भाऊसाहेब जरांगे पाटील, समन्वयक दिनेश गुळवे, राहुल लोंढे, बालासाहेब शेरकर, वसंत पवळ, जीवन मोघे, गंगाधर चव्हाण, गणेश जाधव यांचा सहभाग होता. या अभ्यास गटाने उजणी धरण, भिमा-निरा संगम, धरणावरील कालवा योजना, ऊस व द्रांक्ष, नारळ, चिकू आदी फळबाग शेती, जर्सी गाय व म्हैस पालन, दूध उत्पादन, संकलन व वितरण, शेती जोडव्यवसाय व शेती पूरक व्यवसाय आदींची पाहणी केली, शिवाय शेतकरी व त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञ यांच्याकडून माहिती घेतली. उजणी धरण व कृष्णा खोऱ्यातील पाणी बीड जिल्ह्यातील वंचित व दुष्काळी भागाला मिळाले पाहिजे, पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे बीड जिल्ह्यात पाटपाणी योजना होणे गरजेचे आहे, शेतकरी आत्महत्या थांबून शेतकर्यांचा आर्थिक विकास व्हावा यासाठी उपाययोजना सूचविण्यासाठी व शेतकर्यांमध्ये जागृती करण्यासाठी हा अभ्यास दौरा महत्वाचा असल्याचे या लोकलढा आंदोलनाचे समन्वयक राहुल लोंढे म्हणाले.

नेत्रदीपक असा जलसेतू

लक्ष्मी नृसिंह मंदिर येथे भिमा व निरा नदीचा संगम आहे. याच संगमावर नदीपासून दीडशे ते दोनशे फूट अंतरावर उंच असा जलसेतू ( पाण्याचा पूल) आहे. बारा फूट रुंद व पंधरा फूट उंच असलेल्या या सेतुमधून उजणीचे पाणी पंढरपूर, माढा, माळशिरस तालुक्याला जाते. असे विकासाच्या पाया ठरलेल्या व कोट्यवधी रुपये खर्चाच्या योजना बीड जिल्ह्यात कराव्यात अशी मागणी लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे, आप्पासाहेब महानोर, राहुल लोंढे, बालासाहेब शेरकर यांनी केली आहे.

## महामार्ग अधिकाऱ्यांचा गलथान कारभारामुळे अपघाताला जबाबदार कोण -अँड.संकाये

परळी। प्रतिनिधी

परळी अंबाजोगाई महामार्गावरील कन्हेरवाडी येथे असणाऱ्या रघुनाथ मुंडे पेट्रोल पंपाजवळ बसचा भीषण अपघात झाला त्यामध्ये प्रवासी जखमी झाल्याची माहिती मिळाली वारंवार बातम्या देऊन आणि अधिकाऱ्यांना सांगून सुद्धा महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे हा भीषण प्रकार घडला घडला असून याला जबाबदार कोण असा सवाल सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी केला आहे.



काल रात्री हा अपघात झाला आहे. थातूरमातूर रेडियम चे रघुनाथ मुंडे पेट्रोल पंपाजवळ राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी काम केल्याने ते निघून गेले परिणामी त्या ठिकाणी अपघात झाला या अपघातामध्ये बसचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून त्यामध्ये असणाऱ्या प्रवाशांना सुद्धा शारीरिक हानी भोगावी लागली आहे. अशा वारंवार घटना या अगोदरही याच ठिकाणी घडल्यामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आहे. याकडे संबंधित महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष दिले असते तर अशी घटना घडली नसती भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी योग्य ती उपयोजना करणे गरजेचे आहे. अपघातामध्ये माणसांचा बळी जाण्याची शक्यता आहे त्यामुळे राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा लागेल अन्यथा रेडियमचे काम करून घ्यावे अन्यथा मित्र मंडळाच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

## अंबडमध्ये ट्रक व दुचाकीच्या धडकेत आजी व नातवाचा मृत्यू

### जावयाच्या वर्षश्रधाहून परतताना सासूचा मृत्यू

अंबड। प्रतिनिधी

अंबड-पाचोड रस्त्यावर छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ सोमवारी ७ जुलै रोजी ट्रक आणि दुचाकी यांच्यात झालेल्या जोरदार धडकेत आजी आणि नातवाचा जागीच मृत्यू झाला असून, ट्रक चालक अपघातानंतर फरार झाला आहे. या दुर्दैवी घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



मयतांमध्ये गोपिका रामभाऊ वाघ (वय ५०, रा. डावलवाडी) आणि विशाल कृष्णा पवार (वय १ वर्ष) यांचा समावेश आहे. या अपघातातील दुचाकी (क्रमांक २० ३७५६) ही दुचाकी लखन प्रकाश गायकवाड चालवत डावलवाडी येथून येत होता. मयत गोपिका वाघ या आपल्या जावयाच्या वर्षश्रद्धेचा कार्यक्रम उरकून नातवाबरोबर घरी परतत होत्या. त्याचवेळी समोरून आलेल्या भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

या अपघातात विशाल पवार या चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला, तर आजी गोपिका वाघ यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रकचालकाने घटनास्थळावरून पलायन केले असून, पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. या घटनेने संपूर्ण डावलवाडी परिसरात शोककळा पसरली असून, एकाच कुटुंबातील दोन जणांचे अपघाती निधन झाल्याने गावावर दु:खाचे सावट आहे. अपघात प्रकरणी अंबड पोलीस तपास करत आहेत.

## 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रवेशिका पाठविण्याकरिता मुदतवाढ

बीड। प्रतिनिधी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/ वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दि. ३१ जानेवारी, २०२५ असा होता. आता या पुरस्कारासाठी प्रवेशिका मागविण्याकरिता १९ जुलै, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत.संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

## विठ्ठल नामाच्या गजरात थिरकली पावलं

### अभंग गायन आणि संत कथा स्पर्धांना प्रतिसाद; १५० विद्यार्थ्यांचा सहभाग

बीड । प्रतिनिधी

माइलस्टोन इंटरनॅशनल स्कूल, दत्तनगर, तळेगाव येथे ५ जुलै रोजी भाव भक्तीने ओतप्रोत भरलेला पारंपरिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. संचालक ज्ञानेश्वर तांबे आणि मुख्याध्यापिका सारिका जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमांनी शाळा क्षणभर पंढरपूरातच असल्याचा भास निर्माण केला. १५० विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमधून आपली भक्ती व्यक्त करत वातावरण भारावून टाकले.



या विशेष दिवशी शाळेच्या प्रांगणात संतपरंपरेचा आणि वारकरी चळवळीचा गजर ऐकू येत होता. विठ्ठलाच्या प्रतिमेवर रंग भरण स्पर्धेमध्ये तब्बल ८० विद्यार्थ्यांनी कल्पकतेने रंग उधळले. संतांच्या गोष्टी सादर करण्याच्या स्पर्धेत ३० विद्यार्थ्यांनी प्रेरणादायी जीवन कथांमधून विवेक आणि मूल्यांची शिकवण दिली. अभंग व दोह्यांच्या गायन आणि स्पष्टीकरण स्पर्धेत ४० विद्यार्थ्यांनी आपली भक्ती आणि सृजनशीलता सादर करत उपस्थितांची मने जिंकली. या सर्व उपक्रमानंतर पारंपरिक पद्धतीने दिंडी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी टाळ, मृदंगाच्या गजरात ''विठ्ठल विठ्ठल जय हरि विठ्ठल'' च्या घोषात ताल धरला. पवित्र जयघोषात पावलं थिरकली, ओठांवर हरिपाठ होते, आणि परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. यावेळी दीक्षा हंबारे, सुषमा गाडे, माधुरी तांबे, अनिता जाधव, अर्चना गोरे, सना शेख, आफरीन शेख, अमोल शिरसागर, स्वाती भांडवलकर, अर्चना जोगदंड, जयश्री राऊत, पुनम वाघमारे, रोहिणी आघाव, मंजुश्री राग, ज्ञानेश्वर जरांगे, अशोक चौरे, प्रियंका पेंढारे, दत्ता काकडे, सत्यजित ठाकूर, वनिता काकडे, अश्विनी काकडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संतपरंपरेविषयी आदर, अध्यात्मिक मूल्यांची जाण आणि सामाजिक भावनिक विकास घडून आला, असे समाधान पालकांनी व्यक्त केले.

## जैन, माहेश्वरी, अग्रवाल, ब्राह्मण समाजातील गुणवंताचा सत्कार

जालना । प्रतिनिधी

राजस्थानी समाजातील जैन, माहेश्वरी, अग्रवाल, ब्राह्मण गुणवंत विद्यार्थी - विद्यार्थींनीचा भव्य सत्कार व त्यांचा भविष्यासाठी करिअर मार्गदर्शन येत्या १३ जुलाई २०२५ रविवार रोजी जैन भवन, सकलेचा नगर, जालना येथे आयोजित करण्यात आले आहे. समारोहचा पुर्व तैयारीसाठी महत्वाची बैठक अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. बैठकीचे उद्देश्य व प्रास्ताविक करताना बंब म्हणाले या वर्षी वर्ग ८ वी, १० वी, १२ वी, व त्या पुढे स्नातक स्नाकोत्तर स्पर्धात्मक परिक्षा, शिष्यवृत्ती डॉक्टर, वकील, इंजिनिअर इ. परिक्षा मध्ये उच्च गुण तथा ७५% व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले विद्यार्थीयांच्या प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ प्रदान करून मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येईल.

त्याच बरोबर विद्यार्थीयांच्या भविष्यासाठी देशाचे सुप्रसिध्द मोटीवेटर, करिअर मार्गदर्शक नागपुर येथील प्रा. डॉ. श्री नरेन्द्र भुसारी हे सखोल मार्गदर्शन करतील. मुलांसाठी कला, वाणिज्य, विज्ञान क्षेत्रातील अवसर, वर्तमान काळात उपलब्ध करिअर विकल्प २०२५ च्या वाढत्या करिअर जे आपल्याला यश प्रदान करु शकते. ''कसे बनवाल युवकांना प्रभावशाली'' स्पर्धा, टेक्नॉलॉजीच्या युगात विद्यार्थी यांनी कोणत्या शैक्षणिक क्षेत्राची निवड करावी, कोण-कोणते क्षेत्र भविष्यासाठी उपलब्ध आहे, कोणत्या महाविद्यालयाची, वस्तीगृहाची निवड करावी असे अनेक प्रश्नांवर भुसारी हे मार्गदर्शन करतील. विद्यार्थी, युवक समाजाचे, देशाचे भावी निर्माता आहे. त्यांचा सन्मान करणे, त्यांना प्रोत्साहन देणे, उत्साह वाढविणे आपले कर्तव्य आहे, असे बंब म्हणाले. नरेन्द्र मोदी, सुदेश सकलेचा, कचरुलाल नवलखा, ताराचंद कुचेरिया यांनी आपले विचार मांडले. *यासाठी विद्यार्थी पालकांनी दि. १० जुलाई पर्यंत नांव, कक्षा, मार्क, मोबाईल नं. इ. माहिती दीपक मोदी, कचरु पाटणी, पार्श्वनाथ अंबेकर, शिखरचंद लोहाडे, आकाश अग्रवाल, विजय राठी, राजकुमार दायमा यांच्याशी संपर्क साधुन नोंदणी करावे.* या कार्यक्रमा साठी विजय सुराणा, विनोद बंब, सतिष बोथरा, बसंतीलाल गोलेच्छा आदि परिश्रम घेत आहे.

## खमरुल इमान खान यांच्यावर हल्ला करणाऱ्या दोषींना कठोर शासन करा - नवीदोद्दीन सिद्दिकी

माजलगाव। प्रतिनिधी

जिल्हाभरात आदर्श व्यक्तिमत्व म्हणून परिचित असलेले संपादक हाजी खमरूल इमान खान यांच्यावर हल्ला करणाऱ्या गुंडांवर गुन्हे दाखल करून कठोर शासन करण्यात यावे अशी मागणी समाजवादी पक्षाचे माजलगाव तालुकाध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी यांनी केली आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बरेच दिवसापासून बीड जिल्ह्यात काही संस्था चालक आपापल्या शाळांतून मोठे घोटाळे करत असून असे अनेक प्रकरण विविध शाळांमध्ये चालू आहे. या घोटाळ्यांसंदर्भात दूध का दूध, पानी का पानी व्हावे म्हणून आदर्श व्यक्तिमत्व संपादक हाजी खमरुल इमान खान सतत आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून संस्था, संस्थाचालक व शाळांचे घोटाळे आणि बोगसगिरी उघड करून शासनाच्या निर्दशनास आणून देण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांच्यावर जीव घेण्याचा हल्ला एका गुंड मानसिकतेच्या संस्थाचालकाकडून करण्यात आला. म्हणून पोलीस प्रशासनाने त्याच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर शासन करण्यात यावे. जेणेकरून बीड जिल्ह्यात गुंड मानसिकतेच्या लोकांवर पोलिसांचा धाक राहील. बीड जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार असे अनेक घोटाळे, भ्रष्टाचार शासनाचे निदर्शनात आणून देण्याचा सध्या प्रयत्न करत असून त्यांच्यावर असे जीवघेणे भ्याड हल्ले जर होत असेल तर जिल्ह्यात भ्रष्टाचार वाढेल व बोगस शिक्षक, संस्थाचालकांचे भ्रष्टाचार जोरात वाढेल.

केंद्र व राज्य शासनाने हजारो करोडो रुपयांचा निधी शाळांना दिला आहे. येणाऱ्या भविष्यात चांगले शिक्षण गरजूवंत विद्यार्थ्यांना मिळावे व देशाचे भविष्य उज्वल व्हावे परंतु काही बोगस शिक्षक व बोगस संस्थाचालक, काही सत्ताधाऱ्यांचा व गुंड मानसिकता असलेल्या लोकांची साथ व साह्य घेऊन इमानदार पत्रकार, संपादक व सामाजिक कार्यकर्ते जे २५ ते ३० वर्षापासून इमानदारीने अनेक घोटाळे उघड करून शासनाच्या निदर्शनास आणून देत आहेत असे इमानदार पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्यांवर जर अशा प्रकारे गुंडांकडून हल्ला केला जात असेल तर ही बाब जिल्ह्याला काळीमा लावण्यासारखेच आहे. म्हणून बीड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक साहेबांनी पत्रकारांवर हल्ला करणाऱ्या गुंड व दोषींना ताब्यात घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांतून होत असून माजलगाव समाजवादी पक्षाचे तालुकाध्यक्ष नवीदोद्दिन सिद्दिकी यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून व एका निवेदनाद्वारे बीड पोलीस निरीक्षक साहेब व बीड जिल्हाधिकारी साहेब यांना मागणी केली आहे.

## मत्स्य व्यावसायिकांचा होणार सन्मान

बीड। प्रतिनिधी

राष्ट्रीय मत्स्य शेतकरी दिनाचे औचित्य साधून केंद्र व राज्य शासनाच्या मत्स्यव्यवसायविषयक विविध योजनांची जनजागृती आणि पुणे व छत्रपती संभाजीनगर द्विविभागस्तरीय मत्स्यव्यावसायिकांचा सन्मान सोहळा शनिवार, १२ जुलै रोजी पुण्यातील कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर येथे आयोजित करण्यात आला आहे.

मत्स्यव्यवसाय क्षेत्रामध्ये मत्स्यबीज उत्पादन, मासेमारी, मत्स्यशेती, केज कल्चर, बायोफ्लॉक कल्चर, शोभिवंत मत्स्यव्यवसाय, मत्स्यखाद्य, शितसाखळी, विपणन, नाविन्यपूर्ण मत्स्यउद्योजक, रिव्हर रँन्चिग, मत्स्यपर्यटन, सहकार, सामाजिक, प्रचार-प्रसार या क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणारे अधिकारी, कर्मचारी, व्यक्ती, संस्था, कंपन्या आदींना प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.या कार्यक्रमात विविध योजनांबरोबरच मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा मिळाल्याने होणाऱ्या फायद्यांबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याने जास्तीत जास्त मत्स्यव्यवसायिकांनी कार्यक्रमात सहभाग घ्यावा. अधिक माहितीसाठी संपर्क साधवा, असे आवाहन पुणे व छत्रपती संभाजीनगर विभागाचे प्रादेशिक उपायुक्त विजय शिखरे यांनी केले आहे.

## वैद्यनाथ बँकेची निवडणूक महाविकास आघाडी ताकदीने लढवणार

### बाबासाहेब शिंदे, अ‍ॅड.प्रकाश मुंडे, भोजराज पालीवाल, कॉ.पांडुरंग राठोड यांचे स्पष्टीकरण

परळी। प्रतिनिधी

मराठवाड्यातील अग्रगण्य आर्थिक संस्था असलेल्या वैद्यनाथ अर्बन को. ऑपरेटिव्ह बँकेची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. सहकार खात्याकडून निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर ही निवडणूक बिनविरोध होईल की काय? अशी आशंका सभासद मतदारांमध्ये होती. मात्र महाविकास आघाडीतील सर्व घटकपक्षांची या निवडणुकीच्या संदर्भात मंगळवारी महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत निवडणुकीच्या संदर्भाने महत्त्वपूर्ण चर्चा झाली असून, वैद्यनाथ बँकेची निवडणूक संपूर्ण ताकदीने लढवण्याचा निर्णय झाला असल्याचे स्पष्टीकरण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष अ‍ॅड.प्रकाश मुंडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका प्रमुख भोजराज पालीवाल, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे वरिष्ठ नेते कॉ.पांडुरंग राठोड यांनी केली आहे.



वैद्यनाथ अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाची मुदत संपल्याने नवीन संचालक मंडळाच्या निवडणुकीचा कार्यक्रम सुरू आहे. सोमवारपासून या निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. सभासदांच्या हितासाठी, उद्धारासाठी आणि आर्थिक उन्नतीसाठी या निवडणुकीत महाविकास आघाडीचा पॅनल पूर्ण ताकदीने उभा राहणार असल्याचा निर्णय मंगळवारी घेण्यात आला. परळी वैजनाथ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात यासंदर्भात महाविकास आघाडीतील सर्वपक्षीय नेत्यांची बैठक झाली.

झालेल्या या बैठकीत सर्वपक्षीय नेत्यांचे एकमत झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष अ‍ॅड.प्रकाश मुंडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका प्रमुख भोजराज पालीवाल, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे वरिष्ठ नेते कॉ.पांडुरंग राठोड यांच्या वतीने करण्यात आली. या बैठकीस ज्येष्ठ नेते नारायणराव सातपुते, कॉ. पि.एस.घाडगे, बाळासाहेब देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड, शहराध्यक्ष अ‍ॅड.जीवनराव देशमुख, शिवसेनेचे शहर प्रमुख राजेश विभुते, माधवराव मुंडे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.वैद्यनाथ अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी संपूर्ण ताकदीने उतरणार असून, सभासद मतदारांच्या आर्थिक उन्नतीसाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याची घोषणा करण्यात आली आहे. या निवडणुकीत उमेदवार म्हणून निवडणूक लढवण्याची इच्छा असलेल्या सभासद मतदारांना भाग घेता येणार आहे.

## बोगस कामावरून प्रकाश उजगरे आणि ग्रामस्थांचे आमरण उपोषण सुरू!

बीड । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील मौजे मोरवड येथील जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेतील भ्रष्टाचार, बोगस व निकृष्ट दर्जाच्या कामाच्या विरोधात विद्यार्थी नेते प्रकाश उजगरे, सरपंच विवेक अंडील आणि गावातील अनेक ग्रामस्थांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत आजपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास सुरुवात केली आहे.




सदर प्रकार प्रशासनाच्या वारंवार निदर्शनास आणूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, असा आरोप करत हे उपोषण सुरू करण्यात आले आहे. संबंधित ठेकेदाराने अत्यंत निकृष्ट, अपूर्ण व चुकीच्या पद्धतीने काम केल्याचे स्पष्टपणे निदर्शनास आले असून शासनाची फसवणूक झाल्याचा गंभीर आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे.संबंधित कंत्राटदार संस्थेची काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) नोंद करावी,स्वतंत्र तांत्रिक समितीकडून चौकशी करावी,चुकीच्या पद्धतीने केलेले काम अंदाजपत्रकानुसार नव्याने करावे,जेथे निकृष्ट दर्जाचे काम झाले आहे, तेथे मूळ अंदाजपत्रकानुसार दर्जेदार व नियमबद्ध काम नव्याने करण्यात यावे.दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर विभागीय कारवाई करावी या प्रकरणात जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी यापूर्वीही अनेकदा तक्रारी केल्या होत्या. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्यामुळे आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला, असे प्रकाश उजगरे यांनी सांगितले. प्रश्न मार्गी लागेपर्यंत उपोषण सुरूच राहणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

# बैलासारखे जूंपून औत ओढणाऱ्या किती जणांना मदत केल्यावर सगळे शेतकरी फायद्यात येतील ?

## शेतकरी नेते कालिदास आपेट यांचा सरकारला सवाल

बीड । प्रतिनिधी

हाडोळती येथील वयोवृद्ध शेतकरी अंबादासराव आणि मुक्ताबाई पवार या दाम्पत्याने बैलासारखे स्वतःला जूंपून कोळपे ओढल्याचा व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाल्यामुळे त्या दांम्पत्याला महाराष्ट्राबाहेरून सुद्धा मदतीचा ओघ सुरू झाला आहे. नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे या मराठी कलाकारांनी मागे सात-आठ वर्षांपूर्वी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिलांना प्रत्येकी १५ हजार रुपयांची रोख मदत नाम फाउंडेशनच्या वतीने केल्याचे या निमित्ताने आठवले.अशा मदती केल्याने शेतकऱ्यांचा प्रश्न सुटत नाही.उलट त्या शेतकऱ्यांमध्ये व्यवस्थेविरोधात तयार होणारा असंतोष दाबला जातो. समृध्दी, शक्तीपीठ सारखे रस्ते बांधल्याने किंवा कोयना, उजनी, जायकवाडी, गोसेखुर्द सारखी मोठी धरणे बांधण्याने हा प्रश्न सुटणार नाही.तर अंबादासराव आणि मुक्ताबाई पवार यांनी महाराष्ट्र टाईम्स या डिजिटल मीडियाला जी मुलाखत दिली आहे.त्याकडे नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.



सूट-सबसिडीचे नाही काम, आम्हाला हवेत घामाचे दाम ही भुमिका शेतकरी संघटनेचे संस्थापक मा.शरद जोशी यांनी सन १९८० पासून मृत्यूपर्यंत सातत्याने मांडली. शरद जोशींनी या देशाचे सरकार शेतकऱ्यांना घरावर सोन्याची कौले घालून देईल! परंतु शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव देणार नाही असे निक्षून सांगितले. सरकारचे धोरण हेच, शेतकऱ्यांचे मरण हे त्यांनी उदाहरणासहित शेतकऱ्यांना पटवून दिले. तत्कालीन कॉंग्रेसी सरकार आणि विरोधी राजकीय पक्षांनी त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले. परिणामी सध्या महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्यांचे तांडव माजले आहे. हाडोळतीचे अंबादासराव आणि मुक्ताबाई पवार हे दाम्पत्य शेतकरी संघटनेचे संस्थापक शरद जोशी यांनी मांडलेला विचार महाराष्ट्र टाइम्सच्या मुलाखतीत मांडीत आहे.अंबादासराव पवार आणि मुक्ताबाई पवार या जोडप्याने शेतकऱ्यांना कर्जमुक्त (कर्जमाफी नव्हे)करावे आणि शेतीमालाला रास्त भाव द्यावा अशी भूमिका मांडली आहे. त्यांनी स्वतःला मदत करावी अशी कुठलीही भूमिका मांडली नाही.यावर सत्ताधारी किंवा विरोधक कसलाही निर्णय न करता मदतीचा फार्स करीत आहेत.विरोधी पक्षाच्या आमदारांनी विधानसभेत आठवडाभर आमदार बबनराव लोणीकर, रावसाहेब दानवे आणि सध्याचे कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांबद्दल अपशब्द का वापरले? यावर चर्चा केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उत्तरादाखल विलासराव देशमुख, आर.आर. पाटील,शरद पवार यांनी शेतकऱ्यांच्या विरोधात यापूर्वी कशी मुक्ताफळे उधळली होती? याचे दाखले देतील.यामुळे शेतकरी आत्महत्यांचा कलंक पुसणार आहे का?

शेतीत यांत्रिकीकरण अपरिहार्य...

शेतमजुरांच्या तुटवड्यामुळे सुमारे २५ वर्षापासून मोठ्या प्रमाणावर शेतीमध्ये यांत्रिकीकरण झाले आहे.ट्रॅक्टर, हार्वेस्टिंग, फवारणी यासारखे अनेक डिझेल,पेट्रोलवर चालणारी यंत्रे शेतीत वापरली जातात. नांगरणी, पेरणी, टोकन यंत्र,हात कोळपे, काढणी आदी. कामे यंत्राद्वारे केली जातात. बहुतांश सगळी शेतकामाची यंत्रे अंबादासराव आणि मुक्ताबाई पवार यांच्यासारखीचं ओढावी किंवा ढकलावी लागतात. आतापर्यंत अशी यंत्रे ओढताना शेतकऱ्यांची कुणाला दया आलेली नाही. अंबादासराव आणि मुक्ताबाई पवार यांचे वय पाहता सर्वांना शेतकऱ्यांचा पुळका आला.कणव आलेली दिसते.मात्र त्यांनी शेतकऱ्यांविषयी मांडलेला कर्जमुक्ती (कर्जमाफी नव्हे)आणि शेतीमालाच्या रास्त भावाचा विचार कुणालाही पचनी पडताना दिसत नाही.

नरेंद्र मोदी सरकारने सेंद्रिय शेतीचा पुरस्कार केल्यानंतर राज्यात देवेंद्र फडणवीसांनी लगेचच गोवंश हत्या बंदीचा कायदा लागू केला.गायी,बैलांच्या वाहतुकीवर निर्बंध घातले. कोरोना काळात बंद पडलेले जनावरांचे बाजार अजूनही सुरू झाले नाहीत. गोरक्षक आणि पोलिसांची हप्तेखोरी सुरू झाली. गाय,बैल,म्हशींच्या खरेदी विक्रीवर निर्बंध घातले.जनावरांची खुली वहातूक बंद झाली. जनावरांची वाहतूक करणाऱ्या वाहन चालकावर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. परिणामी बैल आणि गायींना बाजारात खरेदीदार नाही. पशुपालनाचा व्यवसाय धोक्यात आला आहे.दुधाच्या आणि कामाच्या जनावरांना सुद्धा बाजारात मागणी राहिली नाही. याकडे सत्ताधारी तसेच विरोधी पक्षांच्या लोकांचेही लक्ष नाही.वन्य जीव प्राणी संरक्षण कायद्याच्या कठोर अंमलबजावणीमुळे हरीण, मोर, नीलगायी,रोही,रानडुक्कर,कुत्रे यासारखे प्राणी माणसालाच मारायला उठले आहेत.माणूस आपल्याला मारतो हे वन्यप्राणी आता विसरून गेले आहेत.शेतातचं नव्हे तर गावाच्या कडेला येऊन वन्य प्राणी खुलेआम मस्ती करीत आहेत. अंबादासराव आणि मुक्ताबाई पवार उद्या शेतात काम करायला गेले असता वन्य प्राण्याने हल्ला केल्यास नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्यासारखे लोक त्यांना काय मदत करणार? कुठल्या सरकारी योजनेने अहमदपूरचे आमदार, राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब

◀◀ पान ३ वर

## आषाढी एकादशीनिमित्त इरा इंग्लिश स्कुलची वारकरी दिंडी

**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे आषाढी एकादशी निमित्त इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल मध्ये आषाढी एकादशी निमित्त वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.**

यावेळी विठ्ठल रूक्मिणीच्या मुर्ती असलेली पालखी तुळशी वृंदावन घेतलेल्या लहान बालिका ढोल ताशांच्या व अभंगाच्या तालावर डोलणारे छोटे वारकरी तालात टाळ वाजवत दिंडीत सहभागी झाले होते.तसेच सर्व विद्यार्थ्यांचा दिंडी सोहळ्याचा आनंद ओसंडून वाहत होता.शाळेतून निघालेली दिंडी ''ज्ञानोबा माऊली तुकाराम'' च्या जयघोषात व भगव्या पताका हातात घेऊन गावांमध्ये पोहोचली.हनुमान मंदिराच्या समोर इयत्ता पाचवी मधील विद्यार्थीनींनी ''विठ्ठल विठ्ठल विठ्ठला हरी ओम विठ्ठला'' या गीतावर नृत्य सादर केले तसेच इयत्ता तिसरी,चौथी व पाचवीतील विद्यार्थ्यांनी ''माऊली माऊली माऊली'' या गाण्यावर स्वस्तिक बनवले व पंढरपूर मधिल रिंगण सोहळ्याचे दर्शन ग्रामस्थांना घडवले. यानंतर इयत्ता तिसरी मधील विद्यार्थ्यांनी फुगडी सादर केली तसेच विद्यार्थीनींनी अभंग देखिल सादर केले.यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल - रुक्मिणी,संत तुकाराम, संत नामदेव,संत ज्ञानेश्वर,संत मुक्ताबाई,संत जनाबाई,संत कान्होपात्रा यांची वेशभूषा धारण केली होती.दिंडी सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे संचालक श्री.बापुसाहेब भुसारी सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



## पत्रकार जगनबापू सरवदे यांना मातृशोक!

अंबाजोगाई । प्रतिनिधी



येथील पत्रकार जगनबापू सरवदे यांच्या मातोश्री सुलोचनाबाई प्रभाकर सरवदे वय ८५ वर्ष यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. जुन्या पिढीतील अत्यंत शांत ,मनमिळावू, प्रेमळ,सतत हसतमुख,आंबेडकरी चळवळीत स्वतः ला झोकून देऊन नेहमी आंदोलनात सक्रिय सहभागी होत लढा उभारणाऱ्या,पतीच्या निधनानंतर आपल्या मुलांना चांगले संस्कार देऊन कार्यक्षम बनवत स्वतः चे संघर्षमय जिवन त्यांनी झिझवत सर्वांना आपुलकीने, प्रेमाने संभाळत संसाराचा गाडा चालवला.

भु -संपादन कार्यालय बीड येथील सेवानिवृत्त मंडल अधिकारी असलेले नवनाथ सरवदे व पत्रकार जगनबापू सरवदे यांची आई सुलोचनाबाई प्रभाकर सरवदे वय ८५ वर्ष यांचे आज दिर्घ आजारांनी पहाटे ४:३० वाजता निर्वाण झाले आहे. त्यांचा अंतिम संस्कार दि. ८ जुलै २०२५ रोजी दुपारी ४ वाजता यशवंतराव चव्हाण चौक शासकीय दूध डेअरी समोर अंबाजोगाई जि.बीड येथे करण्यात येणार आहे.त्यांच्या पश्चात दोन मुले,तीन मुली,सुना,नातवंडे असा परिवार आहे.

## अवैधरीत्या देशी, विदेशी दारु ताब्यात बाळगुन चोरटी विक्री करणाऱ्या दोघांविरुध्द पोलीसांची कारवाई

**माजलगांव । प्रतिनिधी**

येथील शहर पोलीसांनी अनंत बबन शिंदे रा. नित्रुड ता. माजलगांव जि.बीड हा धारुर रोड परीसरात देशी विदेशी दारु ताब्यात बाळगुन चोरटी विक्री करण्यासाठी घेवुन जात असल्याची माहीती मिळाल्याने पोलीसांनी त्यास दि ०७ जुलै सोमवार रोजी सायंकाळी ०६:३० वाजता पकडुन त्यांचे ताब्यातुन देशी दारु टँगो पंच,इंपेरीयल ब्लु,ऑफीसर्स चॉईस कंपनीचे किंमत ९३२०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन त्याचे विरुध्द माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. २४९/२०२५ कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये कारवाई केली.

त्यानंतर नवीन बसस्थानकाचे कंपाउंड वॉलजवळ अक्षय माणिक साळवे रा. अशोकनगर माजलगांव हा अवैधरीत्या देशी दारुची चोरटी विक्री करीत असल्याचे माहीती मिळाल्या वरुन शहर पोलीसांनी तेथे रात्री ०९:१० वाजण्याचे सुमारास छापा मारुन त्याचे ताब्यातुन देशी दारु टँगो पंच कंपनीच्या ५० बाटल्या किमती २०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन त्याचे विरुध्द गु.र.नं.२५०/२०२५ कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये कारवाई केली आहे. दोन ठिकाणच्या कारवाईमध्ये एकुण ११,३२०/- रुपयांचा देशी / विदेशी दारुचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड,श्रीमती चेतना तिडके,अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई,नीरव राजगुरु उपविभागीय पोलीस अधीकारी, गेवराई अति. पदभार माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोहेकॉ संदिप मोरे, पोलीस अंमलदार सुनिल गवळी, अंगद घोडके यांनी केली आहे.



## पाटोदा तालुक्यातील बसथांब्यांवर निवारा शेड नसल्याने प्रवाशांचे हाल

### तात्काळ बसथांब्यावर निवारा शेड उभारा, सभापती किशोर अडागळे यांची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील पारगाव चौक,राज मोहम्मद चौक,तसेच तालुक्यातील चुंबळी फाटा,वाजरा फाटा आदी ठिकाणी असलेल्या बसथांब्यांवर निवारा शेड नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शाळकरी विद्यार्थी, वयोवृद्ध नागरिक व महिलांना उन्हा-पावसात थांबावे लागत असल्याने त्यांचे हाल सुरू आहेत.या समस्येबाबत नागरिकांनी आवाज उठवला असुन त्यांनी स्पष्ट शब्दांत प्रशासनाला मागणी केली की, ''पाटोदा शहर व तालुक्यातील सर्व बसथांब्यांवर तातडीने निवारा शेड उभारण्यात यावेत. नागरिकांच्या मूलभूत सोयीसुविधांकडे दुर्लक्ष होणे, हे शासनाच्या जबाबदारी पासून पळ काढणे आहे.''



नागरिकांनी प्रश्नांवर ठाम भूमिका घेतली असून, आंदोलनाचा इशारा दिला आहे , जर लवकरात लवकर पाटोदा तालुक्यात व शहरात बस थांब्यावर निवारा शेड उभारण्यात आले नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडेल.असा इशाराही नागरिकांनी दिला असुन गावा गावांतील बसथांब्यांवर बसण्यासाठी बाक व निवारा शेडचा अभाव असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. या सगळ्या समस्या ग्रामीण भागातील प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी गंभीर धोका ठरू शकतात, असेही या मागणीची दखल घेऊन प्रशासन काय पावले उचलते, याकडे तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे



याप्रकरणी पाटोदा नापचे सभापती किशोर आढागळे यांची प्रतिक्रिया घेतली असता

पाटोदा शहरातील बस थांब्यावर हा सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली व न पटोदा अंतर्गत लवकरात निधी उपलब्ध करून शेड बांधकाम केले जाईल व निवारा उपलब्ध केला जाईल

किशोर आडागळे

## शिक्षकांचे निवृत्ती विषयक लाभ देण्यास प्रशासनाकडून दिरंगाई

### संचालक कार्यालयापुढे कास्ट्राईबचा आंदोलनाचा इशारा -अनिल जाधवर

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांची संख्या मोठी आहे .शासन निर्णयानुसार शिक्षक अथवा कर्मचारी सेवानिवृत्त होताना त्यांना मिळणारे अंशराशीकरण व उपदान हे आर्थिक लाभ अतिशय महत्त्वाचे असतात आणि कर्मचाऱ्यांच्या हक्काचे असतात. परंतु अलीकडील काळामध्ये शासनाच्या उदासीन धोरणामध्ये तसेच संचालन कार्यालयाच्या शिक्षक विरोधी धोरणामुळे सेवानिवृत्तांचे सेवानिवृत्ती विषयक लाभ देण्यास दिरंगाई होत आहे . बीड जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त शिक्षकांचे एप्रिल २०२४ पासूनचे अंशराशीकरण व उपदान या रकमा प्रलंबित आहेत. म्हणजे किमान एका वर्षापासून या रकमा प्रलंबित आहेत . करिता कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाचे राज्य अध्यक्ष अनिल जाधवर यांनी संघटनेच्या शिष्टमंडळासह शिक्षण संचालक प्राथमिक माननीय शरद गोसावी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन दिले व चर्चा केली . सदरील चर्चेनुसार महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषदा कडून थकीत अंशराशीकरण व उपदान यांचा आढावा घेऊन या बाबीसाठी वित्त तरतूद करण्यात येणार आहे . तसेच सदरील थकीत असणारी देयके




◀◀ पान ३ वर

## कुसळंब येथील रासपच्या मेळाव्यास उपस्थित रहा-आसाराम महारनवर

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथे गुरु पौर्णिमेचे औचित्य साधून दि.१०/०७/२०२५ गुरुवार रोजी राष्ट्रीय समाज पक्षाचा साई मंदिर परिसरात दुपारी १२ वाजता कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शनपर मेळावा आयोजित केला असून या मेळाव्यास पाटोदा तालुक्यातील राष्ट्रीय समाज पक्षांच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने येऊन उपस्थिती दर्शवावी असे आवाहन रासप पक्षाचे पाटोदा तालुका अध्यक्ष आसाराम महारनवर यांनी केले आहे.



या मेळाव्यास राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर तसेच विक्रम बप्पा सोनसळे,प्रा.माने, कल्पेश भोंडवे,प्रा.काशिद,रतन भोंडवे आदीसह पदाधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.यावेळी आगामी जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणुकीच्या रणनीतीवर विचार विनीमय,शेतकऱ्यांकडील कर्जमाफी पूर्ण माफ करावी,आदि महत्त्वाच्या विषयावर चर्चा केली जाणार आहे.या कार्यक्रमाला वसंत काळे,भगवान उंडे उपस्थित राहणार आहेत.

## कल्याण नावाच्या मटका जुगारावर माजलगांव शहर पोलीसांचा छापा

**माजलगांव । प्रतिनिधी**

येथील शहर पोलीसांना मिळालेल्या बातमीच्या आधारे पोलीसांनी माजलगांव शहरातील जाजु हॉस्पीटलसमोर शिवाजीनगर परीसरात दि ०८ जुलै मंगळवार रोजी ०४:२० वाजता छापा मारुन मटका जुगार खेळवणारा शाम आप्पाराव भालेकर रा. अशोकनगर माजलगांव याचे ताब्यातुन कल्याण मटका जुगाराचे साहीत्य व नगदी पैसे व मोबाईल असा एकुण १३,९५०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.तसेच मटका खेळवणारा शाम आप्पाराव भालेकर रा.अशोकनगर माजलगांव व बुकीमालक शुभम डाके रा.माजलगांव यांच्या विरुध्द गु.र.नं.२५२/२०२५ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड,श्रीमती चेतना तिडके,अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई,निरव राजगुरु उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गेवराई अति.पदभार माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोहवा माधव तोटेवाड,पोलीस अंमलदार सुनिल गवळी,अंगद घोडके यांनी केली आहे.

## उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रवेशिका पाठविण्याकरिता १९ जुलै पर्यंत मुदतवाढ

बीड । प्रतिनिधी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दि. ३१ जानेवारी, २०२५ असा होता. आता या पुरस्कारासाठी प्रवेशिका मागविण्याकरिता १९ जुलै, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने ://.../ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

## राडी तांडा शिवारातील हातभट्टी दारू अड्ड्यावर पोलिसांचा छापा; ६७ हजारांचा मुद्देमाल नष्ट

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी राडी तांडा व शिवारात सोमवारी (दि. ०७ जुलै) अवैधरित्या हातभट्टी दारू तयार करणाऱ्यांविरुद्ध मोठी कारवाई केली. या कारवाईत दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे मारण्यात आले असून एकूण ६७ हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला आहे. तर, दोघा जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

राडी तांडा परिसरात बेकायदेशीररित्या हातभट्टी दारू तयार करण्यात येत असल्याची गुप्त माहिती अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांना मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले यांनी पथकासह राडी तांडा आणि शिवारातील दोन दारू भट्ट्यांवर छापा मारला. या कारवाईत पोलिसांनी १५ प्लास्टिकचे बॅरल व त्यामध्ये साठवलेले १५०० लिटर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# कोंढवा लैंगिक अत्याचार प्रकरणावरून पुणे पोलिस आयुक्तांचा इशारा; म्हणाले, खोटी अफवा पसरवणाऱ्याला सोडणार नाही

पुणे । प्रतिनिधी

पुणे: मागील दोन दिवसांपूर्वी अतिशय गंभीर घटना घडली होती. कोंढवा लैंगिक अत्याचार प्रकरणातील महिलेची तक्रार खोटी तक्रार दाखल करून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला होता, या घटनेनंतर पोलिसांच्या कार्यक्षमतेवरती देखील प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते, त्या घटनेने पुण्यातील कायदा आणि सुव्यवस्था ढासळल्याचं बोललं जात होतं. शहरात महिला सुरक्षित नाहीत अशा प्रकारचे नॅरेटिव्ह पसरवण्याचे काही लोक प्रयत्न करत होते. त्यानंतर आम्ही २४ तासांच्या आत आम्ही सर्व समोर आणले. त्या महिलेने दिलेली तक्रार पूर्णपण खोटी आणि दिशाभूल करणारी होती. जेणेकरून माहिती लपवण्याचे प्रकार समोर आले होते. या घटनेमुळे पुणे शहराच्या चांगल्या प्रतिमेबाबचत कोणीही फेक नॅरेटिव्ह पसरवण्याचे प्रयत्न करू नका. पुणे शहर पोलिसदल पूर्णपणे कार्यक्षमतेने कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पूर्णपणे प्रयत्नशील आहे. जनतेच्या सहकार्याने आणि आपल्या सहभागाने पुढच्या काळात आणखी चांगलं कार्य करू असंही पुढे पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी म्हटलं आहे.



पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी कोंढवा लैंगिक अत्याचार प्रकरणानंतर इशारा दिला आहे. खोटी अफवा पसरवणाऱ्याला सोडणार नाही. दोन दिवसांपूर्वी अत्यंत गंभीर तक्रार पोलिसांकडे आली. पुणे शहरात महिला सुरक्षित नसल्याचं खोटं पसरवण्यात आलं, असं म्हणत आयुक्तांनी इशारा दिला आहे. संगणक अभियंता तरुणीवरील बलात्कार प्रकरणातील पीडितेने सांगितलेला 'कुरिअर बॉय' हा प्रत्यक्षात तिचाच मित्र असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. (शुक्रवारी, या आरोपीला ताब्यात घेण्यात आलं असून सध्या प्रकरणाचा तपास सुरू आहे, अशी माहिती पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिली आहे. त्याचबरोबर तरूणीने केलेले काही आरोप देखील खोटे असल्याचं समोर आलं आहे. घटनेच्या दिवशी कोणत्याही प्रकारच्या स्प्रेचा वापर झालेला नाही. त्याचबरोबर, तरुणीच्या मोबाइलमध्ये आढळलेला सेल्फी फोटो सहमतीने काढलेला असून, त्या खाली लिहिलेला मेसेजही तरुणीनेच एडीट करून लिहिल्याची कबुली दिली आहे, असेही पोलिस आयुक्तांनी सांगितले आहे. या घटनेनं खळबळ उडाली होती. मात्र पोलिसांच्या तपासामध्ये प्रकरण पुर्णपणे उलटं फिरल्यानं आता चर्चांना उधाण आलं आहे.पोलिस आयुक्तांनी या प्रकरणाबाबत दिलेल्या माहितीनुसार, आरोपी तरुण देखील एका नामांकित मल्टीनॅशनल कंपनीत चांगल्या पदावर काम करतो. तो गेल्या वर्षभरापासून तरूणीच्या संपर्कामध्ये होता. दोघांची ओळख समाज मेळाव्यात झालेली होती. त्यांचा एकमेकांशी फोन आणि सोशल मीडियावर सतत संपर्क सुरू होता. तो तिच्या घरी येत-जात असल्याचेही तपासात समोर आले आहे. इतकेच नव्हे; तर तो अनेकदा तिच्या घरी 'फूड डिलिव्हरी ॲप'वरून तिच्यासाठी खाद्यपदार्थ ऑर्डर करून पाठवत होता.घटनेच्या दिवशी तो सायंकाळी सव्वासातच्या सुमारास सोसायटीत येताना दिसला आणि पावणेनऊच्या सुमारास बाहेर पडताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता. पोलिसांनी त्याचा फोटो तिला दाखवला असता तरुणीने त्याला ओळखत नसल्याचे सांगितले होते. मात्र, ती काही वेळ स्तब्ध झाली. 'तुम्हाला हा फोटो कुठून मिळाला?' असा प्रश्नही तिने पोलिसांना केला. ओळखत नाही, हे उत्तर देण्यापूर्वी एक ते दोन मिनिटे ती स्तब्ध झाली होती. त्यामुळे पोलिसांचा संशय वाढला. तांत्रिक तपासात स्पष्ट झाले, की आरोपी तरुण तिच्याच बोलावण्यावरून घरी आला होता.

# पुण्यात भाजपची ताकद आणखी वाढणार; फुरसुंगीत शेकडो कार्यकर्त्यांचा पक्षात प्रवेश

हडपसर । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून राजकारणात विविध घडामोडी घडत आहेत. अनेक नेतेमंडळी पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात जात आहेत. असे असताना पुण्यात भाजपची ताकद आता वाढणार आहे. भाजपचे मंडल सरचिटणीस संतोष हरपळे यांच्या नेतृत्वात व पुणे जिल्हाध्यक्ष शेखर वडणे यांच्या उपस्थितीत शेकडो महिला व कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यात महिलांचा मोठ्या प्रमाणात समावेश होता.

फुरसुंगी, उरळी देवाची, संकेत विहार, भेकराईनगर, पावर हाऊस, माजी सरपंच, माजी उपसरपंच पदाधिकाऱ्यांनी परिसरातील अनेक कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षाचे फुरसुंगी, उरुळी देवाची मंडल सरचिटणीस संतोष हरपळे यांच्या नेतृत्वात पक्ष प्रवेश केले. पक्ष प्रवेशावेळी पुणे जिल्हा अध्यक्ष शेखर वढणे यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी परिसरातील नागरिकांच्या अडचणी ऐकून घेतल्या. नागरिकांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न भाजपकडून गेल्या चार वर्षांपासून केला जात आहे. या पक्षप्रवेशामुळे या भागातील भाजपची ताकद निश्चितच वाढली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत पक्ष प्रवेशाचा भारतीय जनता पक्षाला निश्चितच फायदा होईल. भारतीय जनता पक्षाची ध्येय धोरणे व पक्षामार्फत नागरिकांची कामे कशाप्रकारे चालतात याची माहिती जिल्हाध्यक्षांनी आपल्या मनोगतामधून व्यक्त केली.



यावेळी विविध मान्यवरांनी ही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी संतोष हरपळे यांच्या नेतृत्वाखाली फुरसुंगी उरळी मंडलाच्या विविध पदावर अर्चना राजेंद्र तेलकर यांची महिला आघाडी सरचिटणीसपदी, रेखा युवराज काळे यांची महिला आघाडी उपाध्यक्षपदी, मंगल संजय शिरसाट यांची महिला आघाडी चिटणीसपदी निवड, राणी काकासाहेब नाळे यांची महिला आघाडी विभाग प्रमुखपदी निवड करण्यात आली. तर गणेश ज्ञानोबा धोंडगे यांची भाजप उपाध्यक्षपदी निवड केली गेली. काही दिवसांपूर्वीच, मुंबईमध्ये उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला नुकताच मोठा झटका बसला. कारण माजी महापौर दत्ता दळवी यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर जळगाव जिल्ह्यात शरद पवार यांच्या पक्षासाठीही आव्हान निर्माण होणार आहे. या भागातील काही प्रमुख नेते, माजी मंत्री आणि माजी आमदार लवकरच अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सहभागी होणार असल्याची माहिती समोर येत आहे.

# मोटु का म्हणाला? शाळकरी मुलांमध्ये वाद, मध्यस्थी करणाऱ्या मित्रावर धारधार शस्त्राने वार

पिंपरी । प्रतिनिधी

**पिंपरी चिंचवडमध्ये एका शाळेच्या बाहेर विद्यार्थ्यांमध्ये एकमेकांना चिडवण्यावरुन वाद झाला आणि नंतर त्याने गंभीर वळण घेतले. मोटू का म्हणालास असा जाब विचारल्यानंतर हा वाद झाला आणि तो वाद सोडवण्यासाठी आलेल्या मित्रावरच धारधार शस्त्राने वार करण्यात आले. या प्रकरणी जखमी विद्यार्थ्यावर उपचार सुरू आहेत. सांगवी पोलिसांनी चौघांना ताब्यात घेतलं आहे.**

पिंपळे सौदागर विभग्योर शाळेबाहेर मंगळवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. मला मोटु म्हणून का चिडवतो? यावरुन सोमवारी दोन मित्रांमध्ये वाद झाला होता. हा वाद नंतर चांगलाच वाढला. त्यानंतर चिडवणाऱ्या मित्राला धडा शिकवायचा, असं रागावलेल्या मित्राने ठरवलं.

दुसऱ्या दिवशी तो भावासह इतर तिघांना घेऊन शाळेबाहेर. तू माझ्या भावाला का चिडवतो, धारदार शस्त्र दाखवून भावासह मित्राने चिडवणाऱ्याला जाब विचारला. हे पाहून शाळेतील एक मित्र मध्यस्थी करायला पुढं आला. अशात चिडवणारा मित्र बाजूला राहिला अन् मध्ये पडलेल्या मित्रावरचं शस्त्राने वार करण्यात आले. या हल्ल्यामध्ये त्या मित्राच्या डोक्यात, मानेवर अन हातावर जखमा झाल्या. डोक्यात टाकेही पडलेत. सांगवी पोलिसांनी या प्रकरणी चौघांना ताब्यात घेतलं आहे. पुढील कारवाई सुरु आहे.

# पुणे बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर यांचा राजीनामा; 'या' कारणांमुळे केला पदत्याग

पुणे । प्रतिनिधी

**पुणे : पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप काशिनाथ काळभोर यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे (ग्रामीण) यांच्याकडे सोमवारी (ता.७) राजीनामा सादर केला आहे. बाजार समितीचा कारभार हा संचालक मंडळाच्या हाती आल्यानंतर तो नेहमीच वादात राहिला आहे. काळभोर यांची सभापतिपदी निवड ८ एप्रिल २०२२ रोजी झाली होती.**

राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपचे वर्चस्व असलेल्या या बाजार समितीचा कारभार हा गेल्या काही महिन्यापासून सातत्याने चर्चेला येत होता. बाजार आवारातील अतिक्रमणात होणारी



वाढ, टपऱ्यांची वाढती संख्या, पार्किंगसह इतर कामाच्या निविदा प्रक्रिया, तसेच माजी पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी समितीच्या कारभाराची चौकशीची घोषणा केली होती. नुकतेच राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी देखील संचालक मंडळ बरखास्त करण्याची मागणी केली होती. तसेच संचालक मंडळात देखील गटबाजी वाढली होती. या सर्व पार्श्वभूमीवर काळभोर यांनी सभापतिपदाचा राजीनामा दिल्याने बाजार आवारात चर्चा रंगली आहे. राजीनाम्याआधी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक प्रदीप कंद, बाजार समितीचे ज्येष्ठ संचालक व माजी सभापती प्रकाश जगताप, संचालक रोहिदास उंद्रे, राजाराम कांचन, प्रशांत काळभोर, रामकृष्ण सातव सुदर्शन चौधरी यांच्यासह सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.

काळभोर म्हणाले, माझ्या कार्यकाळात बाजार समितीच्या उत्पन्न वाढीसोबतच बाजार विकासासाठी विविध योजना राबवल्या. तसेच समितीतील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने कार्यरत राहून अनेक निर्णय राबवले. या काळात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कारभारात पारदर्शकता व शिस्त निर्माण करण्यात त्यांचे मोठे योगदान दिले आहे. या पुढेही बाजार समितीच्या विकासकामांमध्ये सक्रिय सहभाग ठेवणार असल्याची ग्वाही यावेळी काळभोर यांनी दिली.

# पुण्यात पोलिस कर्मचाऱ्याची आत्महत्या

पुणे । प्रतिनिधी

पुणे पोलीस दलातील एका कर्मचाऱ्यानं आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर पोलीस दल हादरले आहे. स्वरुप जाधव असे या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. पुण्यातील राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केली आहे. पुण्यातील खडक पोलीस ठाण्यात सध्या याबाबतचा तपास सुरु आहे.

पुण्यातील स्वारगेट येथील पोलीस लाईनमध्ये स्वरुप जाधव हे राहत होते. राहत्या घरात गळफास लावून त्यांनी आत्महत्या केली आहे. आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. पोलिस याबाबतचा तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार स्वरुप जाधव हे पोलीस शिपाई म्हणून पोलीस मुख्यालय या ठिकाणी कार्यरत होते. जाधव हे मूळचे कोल्हापूरचे राहणारे आहेत. सध्या ते स्वारगेट येथील पोलीस लाईन मध्ये वास्तव्यास होते. आज दुपारी त्यांनी राहत्या घरातील हॉलमधील खिडकीच्या अँगलला टॉवेलने गळफास लावून आत्महत्या केल्याची माहिती मिळाली आहे.

# पवना-मुळशीमधून पाण्याचा विसर्ग वाढवला; नागरिकांना सतर्कतेचा इशारा

पिंपरी । प्रतिनिधी

पवना आणि मुळशी धरणांमधून सोमवारी मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात आल्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेने (पीसीएमसी) नदीकाठच्या नागरिकांसाठी सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. शहर आणि धरणांच्या पाणलोट क्षेत्रात सतत पडणाऱ्या पावसामुळे दोन्ही धरणांमध्ये जलसाठा झपाट्याने वाढला आहे. महापालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागाच्या माहितीनुसार, पवना धरण सद्यस्थितीमध्ये ७७.५४% भरलेले आहे. पाणलोट क्षेत्रात पाऊस चालू असून धरणामध्ये येवा प्राप्त होत आहे. धरणातील पाणीसाठा नियंत्रित करणेकरिता सांडव्याद्वारे नदीपात्रामध्ये नियंत्रित पद्धतीने २८०० क्युसेक्स मुक्त विसर्ग चालू आहे.



भारतीय हवामान विभागाने पुढील काही दिवसांत घाटमाथा व पाणलोट क्षेत्रात जोरदार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे धरणांमधून पाण्याचा विसर्ग आणखी वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त आणि प्रशासक शेखर सिंग यांनी आपत्कालीन प्रतिसाद पथकांना पूर्ण सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांनी नदीकाठच्या भागांमध्ये जाणे टाळावे, तसेच सावधगिरी बाळगावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

आपत्ती परिस्थितीत तातडीने कारवाई करता यावी म्हणून पीसीएमसीची आपत्ती प्रतिसाद यंत्रणा पूर्णपणे सज्ज आहे. आवश्यक साधनसामुग्रीसह बचावपथके तैनात करण्यात आली आहेत. आपत्ती नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत असून, वरिष्ठ अधिकारी, उपायुक्त आणि सहाय्यक आयुक्त यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, असे शेखर सिंग यांनी सांगितले. महापालिकेच्या वतीने नागरिकांना कोणतीही अफवा न पसरवता, अधिकृत सूचना आणि इशाऱ्यांनुसारच वर्तन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शिरूरमध्ये शिवसेनेचे संतप्त आंदोलन: गोपीचंद पडळकर यांच्या वादग्रस्त वक्तव्याचा केला तीव्र निषेध

शिरूर । प्रतिनिधी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शिरूर तहसील कार्यालयासमोर आमदार गोपीचंद पडळकर यांच्या वादग्रस्त वक्तव्याच्या निषेधार्थ तीव्र आंदोलन करण्यात आले. माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याविषयी पडळकर यांनी केलेल्या आक्षेपार्ह विधानाने शिवसैनिकांसह महाराष्ट्रातील मराठी जनतेच्या भावना दुखावल्या गेल्या. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा संपर्कप्रमुख आमदार सचिन आहिर, ज्येष्ठ नेते रविंद्र मिर्लेकर आणि जिल्हाप्रमुख अशोक खांडेभराड यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन पार पडले.



आंदोलनादरम्यान संतप्त शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करत पडळकर यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध व्यक्त केला. उपतालुकाप्रमुख अनिल पवार, शेतकरी सेना तालुकाप्रमुख योगेश ओव्हाळ पाटील, तालुका सल्लागार संतोष काळे, ज्येष्ठ शिवसैनिक खुशालबापू गाडे, महिला आघाडीच्या संगिता शिंदे, ग्राहक संरक्षणचे कैलास पवार, माजी चेअरमन तात्या धावडे, माजी सरपंच बंडूसेठ पवार, उपाध्यक्ष साहेबराव कारंडे, अजित पवार, दौलत पवार, प्रताप चव्हाण, सुनिल चव्हाण, संतोष चौधरी, संदीप पवार, ग्राहक संरक्षणचे सुनिल खळदकर यांच्यासह शिवसेनेच्या अंगीकृत संघटना, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या आणि मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

आंदोलनात बोलताना नेत्यांनी ठामपणे सांगितले, शिवसेना आणि मराठी माणसाच्या अस्मितेला दुखावणाऱ्याला महाराष्ट्रात थारा नाही. पडळकर यांनी केलेली तुलना छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी जनतेचा अपमान आहे. अशा आक्षेपार्ह वक्तव्यांचा निषेध करणे ही शिवसैनिकांची खरी जबाबदारी आहे. शिस्तबद्ध आणि ठाम पद्धतीने पार पडलेले हे आंदोलन इतर राजकीय पक्षांसाठीही प्रेरणादायी ठरले. आंदोलनात सहभागी शिवसैनिकांच्या चेहऱ्यावर आक्रोशापेक्षा स्वाभिमानाचा भाव दिसून आला.

# डीजेमुक्त गणेशोत्सवासाठी पुनीत बालन यांचा पुढाकार; डीजे लावणाऱ्या गणेश मंडळांना मदत नाही

पुणे : पुण्याचा वैभवशाली गणेशोत्सव केवळ पुण्यापुरता मर्यादित राहिला नसून अवघ्या जगाचे आकर्षण झाला आहे. हा गणेशोत्सव डीजेमुक्त आणि धार्मिक व आपल्या संस्कृती परंपरेप्रमाणे साजरा झाला पाहिजे, यासाठी यंदाच्या गणेशोत्सवात डीजेवर लावणाऱ्या गणेश मंडळांना जाहिरात स्वरूपात आर्थिक साह्य न करण्याची भूमिका 'पुनीत बालन ग्रुप'चे अध्यक्ष पुनीत बालन यांनी जाहीर केली आहे.

'समर्थ प्रतिष्ठान'च्या ढोल-ताशा पथकाच्या वाद्य पूजन कार्यक्रमात बालन बोलत होते. खासदार मेधा कुलकर्णी, कसबा मतदार संघाचे आमदार हेमंत रासने आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी बालन म्हणाले, ''पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सवाला १३२ वर्षाहून अधिक काळ झाला आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीत जनतेने एकत्र येऊन लढा देण्यासाठी लोकमान्य टिळक आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी यांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरु केला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गणेशोत्सवाच्या माध्यमातून अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात होते. मात्र, अलीकडच्या काळात काही मंडळे मोठमोठ्या स्पीकर्सच्या भिंती उभारून त्यावर अश्लील गाणी लावून गणेशोत्सव साजरा केल्याचे आढळते. यामुळे गणेशोत्सवाला गालबोट लागत आहे, हे आपल्या संस्कृतीला शोभत नाही. त्यामुळे डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याची गरज असून त्यासाठी आता पावले उचलण्याची गरज आहे.''

गणेश मंडळे आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी माणिकचंद ऑक्सिरीच आणि पुनीत बालन ग्रुपच्या माध्यमातून जाहिरातीच्या स्वरुपात गणेश मंडळांना मोठ्या प्रमाणात आर्थिक साह्य केले जाते. परंतु आपल्या गणेशोत्सवाचे वैभव कायम राखण्यासाठी डीजे वर नको ती गाणी लावून आपल्या बाप्पाचे पावित्र्य भंग करणार्या मंडळांना यापुढील आर्थिक साह्य केले जाणार नाही, असे बालन यांनी स्पष्ट करतानाच आपल्या हिंदू देवतांचा उत्सव हा धार्मिक आणि पारंपरिक पद्धतीनेच साजरा झाला पाहिजे अशी ठाम भुमिका मांडली. त्यांच्या या भूमिकेचे समाजातील सर्वच स्तरांतून स्वागत होत आहे.

# खाकीला काळीमा..! पुण्यात पोलिसांकडून महिलेची फसवणूक, ७३ तोळे सोने अन् १७ लाखांची लूट

पुणे : शहर पोलिस दलात खळबळ माजवणारी घटना समोर आली आहे. पुणे पोलिस दलातील गणेश अशोक जगताप या कर्मचाऱ्याने एका ५१ वर्षीय महिलेची तब्बल ७३.५ तोळे सोने आणि १७ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




जगताप आणि फिर्यादी महिला पूर्वीपासून ओळखीचे होते. हीच ओळख वापरत, जगताप यांनी मी पोलिस खात्यात असल्याने माझ्या नावावर कर्ज मिळत नाही, माझ्याकडे ५ किलो सोने आहे, जे दुकानात गहाण आहे, तसेच लवकरच माझ्या नावावरील जमिनीचा व्यवहार होणार आहे; त्यातून सर्व पैसे व दागिने परत करीन अशा विविध कारणांवर विश्वास बसवून महिलेच्या कुटुंबाकडून लाखो रुपये आणि सोने घेतले.

महिलेने पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीनुसार, जगताप यांनी ऑक्टोबर २०१९ मध्ये २४.६ तोळे, तर जानेवारी २०२० मध्ये ४८.९ तोळे असे मिळून एकूण ७३.५ तोळे सोने घेतले. त्याचप्रमाणे फिर्यादी महिला, तिचे पती आणि मुलाकडून वेळोवेळी रोख रक्कम व धनादेशही घेतले.

सध्या फिर्यादी महिलेच्या पैशांची आणि दागिन्यांची परतफेड झाली नसल्याने, आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी थेट पोलिसांकडे धाव घेतली.

आणखी एक सराफी व्यावसायिकालाही फसवले

२१ ऑगस्ट २०२४ रोजी जगताप यांची बदली पोलिस मुख्यालयातील विशेष शाखेत झाली होती. मात्र ते तिथे अनुपस्थित राहिले आणि दरम्यान औंध येथील एका सराफी व्यावसायिकालाही त्यांनी गंडवले. वरिष्ठ अधिकाऱ्याचे खोटे नाव सांगत ८.२२ लाख रुपयांचे दागिने घेतले आणि पैसे मागितल्यावर सराफाला जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकारानंतर तत्कालीन विशेष शाखेचे उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी जगताप यांचे निलंबन केले.

राष्ट्रपती पदकासाठी बनावट कागदपत्रांचा वापर

जगताप यांच्यावर आणखी एक गंभीर आरोप म्हणजे त्यांनी २०२१ मध्ये राष्ट्रपती पदक मिळवण्यासाठी शासनाची फसवणूक केली होती. त्यांनी सेवा पुस्तकातील नोंदी बनावट करून, खोटे दस्त तयार केले. त्यावर बनावट सह्या व शिक्के लावून वेतनवाढीशी संबंधित नोंदी नष्ट केल्या. या प्रकरणी वानवडी पोलीस ठाण्यात जगतापसह दोन लिपिकांविरुद्ध गुन्हा दाखल आहे.